# आधुनिक केसरी

बुधवार, १६ नोव्हेंबर २०२२

किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

मराठी • दैनिक

वर्ष - ०२ • अंक -९६

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

• MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • WEDNESDAY 16 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-96 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5


## पंडित नेहरूंचा पणतूही मुलांचा लाडका!



या बालिकेच्या निरागस प्रेमापुढे जगातील सर्व सत्ता, संपत्ती फिकी आहे.

## अफजलखानाच्या कबरीजवळ कोथळा बाहेर काढत असलेला छत्रपतींचा पुतळा उभारणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : प्रतापगड पायथ्याजवळील अफजलखानाच्या कबरीजवळील अतिक्रमण काढल्यानंतर आता राज्य सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. अतिक्रमण काढलेल्या ठिकाणी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढणारा देखावा असणारा छत्रपती शिवरायांचा भव्य पुतळा उभारणार असल्याची घोषणा मंगळवारी राज्याचे पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केली आहे.**



राज्य सरकारने शिवप्रतापदिनाचे औचित्य साधत प्रतापगडावरील अफजलखानच्या कबरीसमोरील अनधिकृत बांधकाम पाडण्यास पाडलं. 10 नोव्हेंबर रोजी प्रतापगडाच्या पायथ्याला अफजलखानाचा वध करण्यात आला होता आणि याच दिवशी अनाधिकृत बांधकाम पाडण्यात आली. राज्य सरकारच्या या निर्णयानंतर सर्व स्तरातून आनंद व्यक्त करण्यात आला. त्यानंतर आता राज्य सरकारने त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारणार असल्याची घोषणा केली. अफझलखानाच्या वधाला यंदा 350 वर्षे पूर्ण झाली आहेत. अफजलखानाच्या कबरीजवळ ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले आहे त्या ठिकाणी आता अफजलखानाचा कोथळा बाहेर काढत असणारा देखावा असलेला शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार आहे. याचसोबत या ठिकाणी लाईट आणि साऊंड शो सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे पर्यटनाला चालना मिळण्याची शक्यता आहे.

## दिल्ली हायकोर्टाने याचिका फेटाळली; ठाकरे गटाला धक्का

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** हायकोर्टाने ठाकरे गटाची याचिका फेटाळली असून आणखी एक धक्का दिला आहे. ठाकरे गटाने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पक्षनाव व निवडणूक चिन्ह गोठवण्याचा निर्णयाविरोधात दिल्ली हायकोर्टात धाव घेत आव्हान दिलं होतं. मात्र दिल्ली हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली. तसंच निवडणूक आयोगाला यासंबंधी तातडीने निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हा निर्णय निवडणूक आयोगाच्या अधिकारकक्षेत असल्याचंही कोर्टाने स्पष्ट केलं.
शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर, एकनाथ शिंदे गट व उद्धव ठाकरे गट या दोन्ही गटांनी शिवसेना या पक्षनावावर व धनुष्य-बाण या निवडणूक चिन्हावर दावा केला होता. दोन्ही गटांनी सादर केलेल्या लेखी निवेदन व पुराव्याच्या आधारे केंद्रीय निवडणूक आयोगाने ८ ऑक्टोबर रोजी पक्षनाव व निवडणूक चिन्ह गोठवण्याचा हंगामी निर्णय घेतला. या हंगामी निर्णयाविरोधात शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाने दिल्ली हायकोर्टात आव्हान दिलं होतं. त्यावर कोर्टाने आज निर्णय दिला. मी पक्षप्रमुख आहे, मी ३० वर्षे पक्ष चालवलेला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना हे पक्षाचे नाव आणि धनुष्य-बाण गोठवण्याचा घेतलेला निर्णय केवळ प्रथमदर्शनी समोर आलेल्या मुद्द्यांच्या आधारे घेतलेला आहे. हा आधार समाधानकारक असू शकत नाही. त्यामुळे निवडणूक आयोग पक्षनाव व निवडणूक चिन्ह गोठवू शकत नाही. आयोगाच्या निर्णयामुळे माझ्या वडिलांनी निश्चित केलेले पक्षाचे नाव व चिन्ह याचा मला वापर करता येत नाही', असा युक्तिवाद शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाच्या वतीने सोमवारी दिल्ली उच्च न्यायालयात करण्यात आला होता.
पक्षनाव व चिन्ह गोठवण्याचा केंद्रीय निवडणूक आयोगाचा हंगामी निर्णय बेकायदा असून पक्षाचे सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत, असा दावा ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आला होता. या निर्णयाचा गंभीर परिणाम उद्धव ठाकरे व त्यांच्या पक्षाला भोगावा लागत आहे. पक्षनाव व निवडणूक चिन्ह गोठवण्याआधी सर्व कागदपत्रांचा व त्यासंदर्भातील परिमाणांचा सखोल अभ्यास केल्याशिवाय केंद्रीय निवडणूक आयोगाला चिन्ह गोठवण्याचा निर्णय घेता येणार नाही, असाही युक्तिवाद ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आला होता.

## राष्ट्रवादीच्या रणरागिणी मंत्रालयावर धडकल्या

### शिंदे - फडणवीस सरकारविरोधात मोर्चा; सत्तारांची हकालपट्टी करा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ५० खोके ,माजलेत बोके... ५० खोके, एकदम ओके... सुसंस्कृत महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासणा-या अब्दुल सत्तार यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा... आटली की बाटली, कचकन फुटली, खोटे गुन्हे दाखल करताना लाज नाही वाटली... या सरकारचे करायचे काय, खाली डोके वर पाय... अशा जोरदार घोषणा देत राष्ट्रवादी महिला काँग्रेसने आज सायंकाळी शिंदे - फडणवीस सरकारच्या विरोधात मंत्रालयावर मोर्चा काढला.
आज राष्ट्रवादी महिला काँग्रेसची राज्यस्तरीय बैठक मुंबई प्रदेश कार्यालयात पार पडली. त्यानंतर राष्ट्रवादीच्या महिलांनी कार्यालय ते मंत्रालयाकडे घोषणा देत कूच केली.
राष्ट्रवादीच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांना मंत्री अब्दुल सत्तार यांनी केलेली शिवीगाळ आणि शिंदे सरकार खोटे गुन्हे दाखल करत असल्याने महिलांच्या मनात प्रचंड चीड होती त्यातूनच आज राष्ट्रवादीच्या रणरागिनींनी थेट हल्लाबोल केला.
राष्ट्रवादीच्या शेकडो रणरागिनी सरकारविरोधात जोरदार घोषणा देत मंत्रालयाकडे निघाल्याचे समजताच पोलिसांची तारांबळ उडाली आणि मग भेटेल तिथे महिलांना अटक करण्याचा सपाटा लावला. मात्र पोलिसांच्या दंडेलशाहीला न जुमानता मंत्रालयावर धडक दिली.
या मोर्चाचे नेतृत्व प्रदेशाध्यक्षा विद्याताई चव्हाण आणि राज्यातील त्यांच्या सर्व महिला पदाधिकाऱ्यांनी केले. याशिवाय मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष नरेंद्र राणे व पदाधिकारी, कार्यकर्ते हेही उपस्थित होते.




## मुलींना हवाय सिटीतला नवरा ! बागायतदारांचे बंगले 'लक्ष्मीविनाच'

### लग्नासाठी पोरं शहरात कामाला

आधुनिक केसरी न्यूज

गोकुळसिंग राजपूत

सोयगाव : नोकरी आहे का? पॅकेज किती? शहरात राहणार का? असे एक ना अनेक प्रश्न मुलीकडील पाहुण्या कडून विचारले जात असल्याने लग्नाचे वय होऊनसुद्धा शेतकऱ्यांच्या मुलांची लग्नगाठ बांधली जात नसल्याने शेतकऱ्यांच्या मुलावर वयाची 30- 35 वर्षे ओलांडूनही लग्नाविना राहण्याची वेळ आली आहे. यासाठी शेतकऱ्यांनी आता मुलांना कंपनीमध्ये नोकरीसाठी पाठवण्यास सुरू केले आहे. वर्षभरातील त्याच्या पगाराची रक्कम आणि एका पिकात तेवढे उत्पन्न निघते हे वास्तव आहे. सोयगाव



तालुक्यातील सावळदबारा सह परिसर कापूसच्या पिकांमुळे ग्रीन बेल्ट म्हणून समजला जातो. अनेर येथील अनेक डॅम कृपेमुळे या भागातील शेतकरी कापूससारखी पिके घेऊ लागले आहेत. कापूससारखे किमती पिके घेतल्यामुळे त्यातून लाखो रुपयांची कमाई शेतकऱ्यांना होत आहे. कापूससारख्या पिकातून मिळालेल्या उत्पादनाच्या पैशातून शेतकऱ्यांनी सर्व सुख सुविधा युक्त अलिशान बंगले बांधले आहेत. शिवाय अलिशान गाड्या दिमतीला आहेत.
शेतकऱ्यांसमोर वयात आलेल्या आपल्या मुलांच्या लग्नाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावू लागला आहे. टिटवी, जामठी, फर्दापूर, जरंडी, मोलखेडा, घाणेगांव तांडा, नादांतांडा,देव्हारी, पिपळवाडीआदी खेडेगावातून वयात आलेली मुले लग्नापसून वंचित आहेत. मुलींना ग्रामीण भागात संसार करण्याची आवड वा इच्छा नाही. ग्रामीण भागातील मुलीसुद्धा ग्रामीण भागात शेतकऱ्याच्या घरात लग्न करण्याच्या मनस्थितीत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. मुलगा पदवीधर असला, तरी त्यास चांगली बागायती व उत्पन्न देणारी शेती असली, तरी मुलींना शेतकरी नवरा नकोय. शहरात राहणारा, नोकरी करणारा मुलगा पसंत करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे 30-35 वर्षाचे वय होऊन सुद्धा शेतकऱ्यांच्या मुलांचे लग्न ही मोठी समस्या निर्माण झाली आहे.

**बोहल्यावर चढू पाहणाऱ्या मुलांनी करायचं काय ...?**
अशी तिची केवळ धुळे जिल्ह्यातच नव्हे तर सबंध महाराष्ट्रभर आहे . नोकरीमध्ये मिळणाऱ्या पैशात आणि शहरात राहण्याच्या हौसेखातर ग्रामीण भागातील मुलींना शेतकरी मुलगा पसंत नाही . असे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे . अगदी शेतकरी राजा ही आपली मुलगी नोकरदारालाण द्यावी यावर ठाम असतात . मग अशा मुलांनी करायचं काय ...? असाही सवाल बोहल्यावर चढू पाहणाऱ्या युवकांमधून होऊ लागला आहे .

---

शेतकऱ्याच्या मुलाचे वय होऊनही त्यांची लग्न जमत नाहीत . ही मोठी समस्या शेतकरी कुटुंबात असून, शेतकरी साऱ्या जगाचा पोशिंदा आहे . लॉकडाऊन मध्ये सर्व क्षेत्रे बंद होती . पण शेतकऱ्याची शेती सुरू होती . याचा विचार करून याविषयी प्रबोधन होणे गरजेचे आहे .


**शेतकरी घाणेगांव तांडा**

---

दोन पुतण्या चे वय होऊनही लग्न जमत नसल्याने नाविलाजाने पुण्याला कंपनीत कामाला पाठवले आहे . आता लग्न जमतील अशी आशा आहे . मला जमीन आठ एकर आहे आणि मुलाला 16 हजार पगार आहे . यापेक्षा शेतात उत्पन्न जास्त मिळते .

**शेतकरी सावळदबारा**

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# फिटे अंधाराचे जाळे

आधुनिक केसरी

आपण कौतुकाने एखादे झाड लावतो. कधी एखादी वेल लावतो. आपण लावतो तेव्हा ते किती नाजूक असते ! किती काळजी घ्यावी लागते, किती जपावे लागते ! अशीच एक वेल सांगलीच्या करमरकर कुटुंबीयांनी लावली. ती मोठी व्हावी म्हणून जीवापाड जपले. या वेलीचं नावच वल्लरी. तिची कहाणी मोठी रोचक आणि प्रेरणादायी आहे. या रोमहर्षक कहाणीपर्यंत मी योगायोगानेच पोहोचलो. त्याचे झाले असे की माझा ' सावळबाधा ' या नावाचा लेख सांगलीचे श्री भालचंद्र करमरकर यांना व्हाट्सअपवर वाचायला मिळाला. त्यांना तो आवडल्याने त्यांनी माझ्याशी संपर्क साधला. त्यांनी लेख आवडल्याचे सांगून माझी चौकशी केली. मी त्यांना सहज विचारले ' आपण काय करता ? ' ते म्हणाले, ' मी शिक्षक होतो. आता माझे वय ९४ वर्षे आहे. ' हे ऐकून मी उडालोच. वयाच्या ९४ व्या वर्षी व्हाट्सअपवर एखाद्याचा लेख वाचून त्याला प्रत्युत्तर देणे ही गोष्ट माझ्या दृष्टीने तरी आश्चर्यकारक



आणि कौतुकास्पद आहे. मी या पितृतुल्य व्यक्तीला फोनवरूनच नमस्कार केला. त्यांच्याबद्दल अधिक जाणून घेण्याचे माझे कुतूहल शमले नव्हते. मग ते सांगू लागले की माझी पत्नी आता ८५ वर्षांची आहे. मग मी त्यांच्या मुलांबद्दल चौकशी केली. तसे ते म्हणाले, ' मला एक मुलगी आहे वल्लरी नावाची. ' थोडी अधिक चौकशी करताना मला कळले की वल्लरी ही चारचौघांसारखी सामान्य नाही. तिची विशेष काळजी घ्यावी लागते. ती मेंदूच्या पक्षाघाताची ( cerebral palsy ) लहानपणीच शिकार बनली. ती आयुष्यभर अशीच राहणार आहे हे कळूनही करमरकर कुटुंबीयांनी दुसरे मूल होऊ दिले नाही. त्या मुलीला तळहाताच्या फोडासारखे आयुष्यभर जपले. त्यांची तपश्चर्या अडीच तीन तपाहूनही अधिक काळ. जी वल्लरी काहीही करू शकत नव्हती, ती जिद्दीने बी ए झाली, एम ए संस्कृत प्रथमवर्गात उत्तीर्ण झाली. हे सगळं ऐकून मी थक्क झालो. त्यांनी वल्लरीबद्दल, तिची हुशारी, तिची स्मरणशक्ती, गाण्यांची आवड याबद्दल अशा काही गोष्टी सांगितल्या की वल्लरीबद्दलचे माझे कुतूहल आणखीनच वाढले. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांची गरज

आधुनिक केसरी

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर आपले अंतर्बाह्य व्यक्तिमत्व कसे असू शकेल, हे ठरते. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपले व्यक्तिमत्व ऐट अणू शकते. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण अनुभवताना, त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणे आवश्यक असते. आपली, आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपापल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते. आपली सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकेच सुंदर सजवायचे, खुलवायचे असते. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारे मन मात्र मोठे असावे लागते. आपल्या छोट्या प्रतीमेतूनच मोठ्या मनाने सौंदर्याचा साक्षात्कार घडवायचा असतो, त्यातच जीवनातले सार सामावलेले असते.

नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते. आपल्या मनांत येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो.



आधुनिक केसरी

## स्थिरावले मन | पांडुरंगी ||

तेच माझे घर | जिथे तुझा वास ||
आणिक निवास | स्मशान ते ||१||

सहज बोलणे | असावे भजन ||
तुझेच पूजन | घडो सदा ||२||

संत सज्जनांची | घडावी संगती ||
शुद्ध व्हावी मती | विठुराया ||३||

दोन लोचनासी | दिसे एक रूप ||
द्वैत ते स्वरूप | लोपले गा ||४||

श्वासात गुंतले | तुझेच चिंतन ||
स्थिरावले मन | पांडुरंगी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

## अंबानाम-महात्म्य

जया माहूराची ओढी।
लागता नामाची गोडी।
सुटली सारी गाठोडी।
भवपाश सर्व तोडी।
दुःख मनातून काढी।
गंध विषयाचे सांडी।
माय वाढी चंद्रहासे।
सुधा हिरण्याचे वाटी।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## विनवणी

एकवीरा नाम शोभे। तुज माये जगदंबे।
स्नुषा भृगुकुलाची। पवित्र उषा जैसी।
माय परशुरामाची। साय जैसी दुधावरची।
चंद्रहास वदे माई। गाई गीत अंगाई।।

# ।। दासबोध स्तवन ।।

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

तो मिळवण्यासाठी आपण दरवर्षी व्यासपूजा करतो. दरवर्षी न चुकता गुरूपौर्णिमा साजरी करतो.सद्गुरूच्या वचनावर आपलं आयुष्य वचनबद्ध ठेवावं सगळा मार्ग सद्गुरु दाखवतील यात शंकाच नाही. ब्रम्ह हे गुणरहित,आकाररहित,संगरहित,विकाररहित व मर्यादारहित आहे. ते सर्वांना व्यापून अनेकामध्ये एकपणाने आहे. ते शाश्वत आहे.आपण बोलीभाषेत म्हणतो की तो काय ब्रम्हज्ञानी आहे ?किंवा ते काय ब्रम्हवाक्य आहे का? असे शब्द आपण जरी व्यवहार सदैव वापरत असतो आणि ते ब्रम्हज्ञान समजून घेणे म्हणजेच हा "ब्रम्हनिरूपण "समास आहे. ब्रम्ह कधीही न ढळणारे व कधीही अंत नसणारे आहे. ब्रम्हाचा कधीही शेवट होत नाही. त्याच्या बद्दल कधीही कल्पना करता येत नाही. तो कल्पना रहित आहे. ब्रम्ह द्रुष्याच्या पेक्षा वेगळे आहे. ते साध्या डोळ्याने पाहू म्हटले तर ते दिसत नाही. ब्रम्ह दिसते तसे नाही. द्रुष्य लय पावल्यावर शुन्य उरते.ब्रम्ह तर अतींद्रिय असल्याने सर्व इंद्रियांना मिळून ते जगण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना न कळणार असे आहे. साधूसंताच्या मार्गदर्शना वाचून ब्रम्ह आपल्याला कळत नाही. ब्रम्ह सगळ्या पेक्षा वेगळे आहे. त्याच्या पेक्षा श्रेष्ठ दुसरे काही नाही. ते एवढे सुक्ष्म आहे की साध्या डोळ्यानी ते दिसत नाही. **(क्रमशः)**



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**हरीभक्त वीरक्त विज्ञानरासी।**
**जेणें मानसी स्थापिलें निश्चयासी।**
**तया दर्शनें स्पर्शने पुण्य जोडे।**
**तया भाषणे नष्ट संदेह मोडे।।१३३।।**

**सरळ अर्थ :** जो निश्चयपूर्वक वागतो, बोलतो, जो निरिच्छ होऊन हरीभक्तीत तल्लीन होऊन रहातो अशा भक्ताच्या दर्शनामुळे आणि त्याचा पदस्पर्श केल्याने पुण्यप्राप्ती होतेच, शिवाय त्याच्याशी संवाद केल्याने आपल्या मनातील शंकाकुशंकांचा नाश होतो.

**विवेचन :** उत्तम भक्त कसा असावा किंवा असतो, त्याची लक्षणे कोणती? किंबहुना संतांची ठळक लक्षणे वरील श्लोकात समर्थ आपल्याला सांगत आहेत. सामान्य मनुष्य मात्र संतांची ओळख त्यांच्या बाह्य स्थितीवरून करू पाहतो. संतांची ओळख ही बाह्यस्थितिवरुन करणे कदाचित चुकीचे ठरू शकेल कारण ज्याची परीक्षा करायची त्याची किमान प्राथमिक माहिती आपल्याला असणे गरजेचे आहे. हरिदास अर्थात भक्त कसा असावा हे श्रीसमर्थ पुढील ओवीत सांगतात. ते म्हणतात,
"तैसा हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त । वित्पन्न आणि वादरहित । तरी हेहि अपूर्वता ॥" ( दा. १४.०५.०४ )
आधी होऊन गेलेल्या संतांमध्ये कोणी दरवर्षी वारी करीत असत कोणी आपल्या घरीच हरिभक्ती करीत असत. कोणी तीर्थ यात्रा करीत तर कोणी पंढरपूर पाहिले देखील नाही. कोणाच्या घरी गरीबी तर कोणी अत्यंत श्रीमंत, कोणी स्वच्छतेचे काम



स्वीकारले तर कोणी राज्य उपभोगले, कोणी सुखी संसार केला, कोणी संन्यास घेऊन विश्वाची चिंता करीत समाजमानस चेतविण्याचा प्रयत्न केला. या सर्वांमध्ये खरे साम्य काय असेल तर ते म्हणजे भगवंतावर अविचल आणि अव्यभिचारी निष्ठा, पूर्ण वैराग्य आणि विशुद्ध अंतःकरण.

समर्थ अशा सत्पुरूषाचे वर्णन पुढील ओवीत करतात.
"आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा । दुष्ट पातकाची बाधा । निरसोन गेली ॥ (दा. १०.१०.६५)
संताच्या सहवासात मनुष्याला शांतीचा लाभ होतो. त्यांच्या पावन दृष्टीने त्याची तळमळ, तगमग थांबते. त्यांच्या सहवासाने त्याला आपल्या सुख दुःखांचा अल्पकाळ तरी विसर पडतो. त्यामुळे त्याला संतांचा सहवास हवाहवासा वाटू लागतो.
आजकाल कितीतरी बुवा, महाराज, गुरुजी आपल्या नावामागे अमके महाराज, तमके महाराज असे बिरूद जोडतात, परंतु त्यांच्या बोलण्यातून जाणवते, ते आचरणातून जाणवत नाही.
हरिचा खरा भक्त अंगी वैराग्यसंपन्न निरिच्छ असतो, ज्ञानी असतो, भौतिक, आध्यात्मिक साऱ्याच गोष्टींचे ज्ञान त्याला प्राप्त झालेले असते. भजन, पूजन, चिंतन, मनन, सर्व प्रकारांनी हरिची भक्ती करायची या विचारावर तो ठाम असतो आणि निश्चयपूर्वक तसे आचरण करीत असतो. हरीभक्तीत, हरीनामजपात तो तल्लीन होऊन रहातो, सांसारिक चिंतेला त्याच्या मनात जागा असत नाही इतका तो विरक्त असतो. अशा भक्ताचे दर्शन, त्याचा स्पर्श पुण्यदायी ठरतो. त्याच्याशी संभाषण झाले तर आपल्या मनातील संदेह, शंकाकुशंकांचे निरसन होत असते.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

सध्याच्या काळ थोडा अवघड आहे. एकतर संतांची भेट घडणे मुश्किल, भेट झाली तर ओळखणे कठीण, ओळखल तर विश्वास बसणे अवघड, ही मालिका कितीही वाढविता येईल. आपण जसे आपल्या मुलाला नववी पासूनच दहावीच्या शिकवणी वर्गाला जायला लावतो. अगदी तसेच,आपण ही संतांचा एकेक गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न आजपासूनच करायला हवा. साठीनंतर परमार्थ करायचा असतो, हा जावईशोध ज्याने लावला, त्याने आपल्या अनेक पिढ्यांचे अतोनात नुकसान केले आहे. संतांचा सहवास मिळाला तर उत्तम, परंतु त्यासाठी अडून न राहता अखंड नाम घेण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला नित्य संत्संग लाभेल.
सर्वांना संत होणे कदाचित जमणार नाही, परंतु काही गोष्टी नियम म्हणून नक्की आचरणात आणता येतील. सूर्योदयापूर्वी उठणे, काही माळा जप करणे, हलका व्यायाम करणे, जिभेवर नियंत्रण ठेवणे... इ. इ.
पूर्वी भारतात संत नुसत्या कृपादृष्टीने, स्पर्शाने, अनुग्रहाने ज्ञान देत असत आणि वेळ पडल्यास ज्ञान काढूनही घेत असत. ( महाभारतीय युद्धात कर्णाला मोक्याच्या वेळी धनुर्विद्या विसरशील असा शाप होता. ) काळाच्या ओघात हे लुप्त झाले असावे. दासबोधात श्रीसमर्थ याचा उल्लेख करतात,
"मुख्य शक्तिपात तो ऐसा । नाहीं चंचळाचा वळसा । निवांतीं निवांत कैसा । निर्विकारी ॥" ( दा. १५.१०.१३ )
भक्ति, विरक्ती आणि ज्ञान हे तीन गुण सामान्य मनुष्याच्या अंगी सापडणे मुश्किल, मात्र ते संतांच्या ठायी असतातच असतात.

**|| जय जय रघुवीर समर्थ ||**

# मोदींनी आदिवासींचे जल, जंगल, जमीनचे अधिकार हिरावून घेतले

## जयराम रमेश : बांबू व्यवसायाचे हक्क ग्रामसभेला देण्याचा काँग्रेसचा निर्णय फडणवीसांनी फिरवला

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** आदिवासींच्या हक्क व अधिकारासाठी आदिवासांचे जननायक बिरसा मुंडा यांनी ब्रिटिशांविरोधात मोठा संघर्ष केला. बिरसा मुंडा यांची आज १२२ वी जयंती आहे पण आदिवासींना त्यांचे हक्क मिळू दिले जात नाहीत. काँग्रेस सरकारने आदिवासींच्या हिताचे निर्णय घेतले होते पण वन अधिकार अधिनियम २००६ व भूमी अधिग्रहण कायदा २०१३ यातून त्यांना हक्क मिळाले होते पण मोदी सरकार आल्यापासून हे कायदे कमजोर करण्यात आलेत. आदिवासींची जमीन बड्या उद्योगपतींच्या घशात घालण्याचे काम केले जात आहे. आदिवासींच्या जल, जंगल, जमिनचे त्यांचे हक्क मोदी सरकार हिरावून घेत आहे असे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे अध्यक्ष जयराम रमेश यांनी म्हटले आहे. वाशिम येथे पत्रकारांशी संवाद साधताना जयराम रमेश म्हणाले की, भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आदिवासींना वनवासी संबोधते, आदिवासी नाही. मोदी सरकार हे आदिवासींची सर्व जमीन जबरदस्तीने घेऊन उद्योगपतींना देऊन त्यांच्या हक्कांवरच गदा आणत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु या प्रकरणात लक्ष घालतील अशी अपेक्षा आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यांदा काँग्रेसने गडचिरोली जिल्ह्यातील मेंडालेखा गावात एका कार्यक्रमाच्या माध्यमातून बांबू व्यापारावरील नियंत्रण ग्रामसभेला देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला होता. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व गृहमंत्री आर आर पाटील यांच्या उपस्थितीत हा निर्णय घेतला होता पण त्यानंतर आलेल्या भाजपाच्या फडणवीस सरकारने हा निर्णय फिरवला व पुन्हा हे अधिकार वन विभागाला दिले. ग्रामसभा सशक्त बनवणे ह्याला काँग्रेसचे प्राधान्य आहे. आदिवासांना त्यांचे हक्क मिळावे हीच काँग्रेसची भूमिका आहे पण भाजपा आदिवासांच्या हिताच्या आड येत आहे.



भारत जोडो यात्रेचा आजचा ६९ वा दिवस आहे. या पदयात्रेत दररोज समर्थन वाढत आहे. त्यातही महिलांचा या पदयात्रेतील सहभाग हा लक्षणीय आहे. हजारोंच्या संख्येने महिला, लहान मुली पदयात्रेत मोठ्या आत्मविश्वासाने सहभागी होत आहेत असे जयराम रमेश म्हणाले.

यात्रेत सहभागी झालेल्या काँग्रेसच्या महिल्या नेत्यांनी आपले अनुभव यावेळी व्यक्त केले. माजी मंत्री यशोमती ठाकूर म्हणाल्या की, दिवसभर पदयात्रेत चालल्यानंतरही थकवा जाणवत नाही. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील या पदयात्रेतून एक सकारात्मक उर्जा निर्माण होत आहे, ही सकारात्मक उर्जा माणसांना जोडण्याचे तसेच देशाला जोडण्याचे काम करत आहे.

प्रदेश कार्याध्यक्ष आ. प्रणिती शिंदे यावेळी म्हणाल्या की, ही पदयात्रा मानवतेची यात्रा असून महिलांचा सहभाग आनंद देणारा आहे. पदयात्रेत महिला मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहेत. काँग्रेस पक्ष हा महिलांचे हित जोपासणारा पक्ष आहे. आ. डॉ. प्रज्ञा सातव म्हणाल्या की, भारत जोडो यात्रेत महिलांचा सहभाग मोठा आहे. महागाईचा मुद्दा हा महिलांचा अत्यंत जवळचा मुद्दा आहे. ४०० रुपयाचा स्वयंपाकाचा गॅस आज १२०० रुपये झाला आहे पण त्याविरोधात भाजपाचा एकही नेता तोंड उघडत नाही. काँग्रेस सरकार असताना ४०० रुपयांचा गॅस त्यांना महाग वाटत असे व मोदी, स्मृती इराणींसह अनेक नेते रस्त्यावर उतरून आवाज उठवत होते पण आज गॅस १२०० रुपयांचा झाला तरी मोदींना महिलांना होणारा त्रास दिसत नाही. भारत जोडो यात्रेत महिलांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मांडले जात आहेत, त्याला वाचा फोडली जात आहे. या पत्रकार परिषदेला माजी मंत्री यशोमती ठाकूर, प्रदेश काँग्रेसच्या कार्याध्यक्ष आ. प्रणिती शिंदे, आ. डॉ. प्रज्ञा सातव, प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाच्या महिमा सिंह या उपस्थित होते.

# कोल्हापूर अर्बन बँकेत विरोधकांचा धुव्वा

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** करवीर नगरीतील जुन्या कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीत शिंदे – कणेरकर आघाडीची सरशी झाली. सर्व १५ जागा मोठ्या फरकाने जिंकून त्यांनी विरोधी निगडे – जाधव गटाला जोरदार धक्का दिला. कोल्हापूर अर्बन बँकेला शतकोत्तर परंपरा आहे. बँकेचा गेल्या काही कालावधीतील कारभार वादग्रस्त झाला होता. सत्ताधारी गटातून बाहेर पडलेल्या संचालकांनी टीका टिप्पणी चालवली होती. त्यामुळे निवडणूक लागण्यापासूनच वातावरण तापले होते. बँकेचे माजी अध्यक्ष शिरीष कणेरकर यांच्या जुन्या पॅनलला माजी अध्यक्ष उमेश निगडे, संचालिका गीतादेवी जाधव यांच्या राजर्षी शाहू भास्करराव जाधव संस्थापक पॅनलने आव्हान दिले होते. रविवारी चुरशीने ४८ टक्के मतदान हे मागील निवडणुकीपेक्षा ८ टक्के अधिक असल्याने निकालाचा कल कसा राहणार याची उत्सुकता होती. मात्र आज कणेरकर -शिंदे पॅनलने सुरुवातीपासूनच घेतलेली आघाडी अखेरपर्यंत कायम ठेवली. या आघाडीने विरोधकांपेक्षा दुप्पट मते घेऊन मतदारांचा कौल आपल्या बाजूने असल्याचे दाखवून दिले.





# बिरसा मुंडा आदिवासी समाजाचे शिल्पकार

## माधव अमृतवाड यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** स्वातत्रसेनानी क्रांतीसुर्य बिरसा मूंडा यांनी समाजाला मुख्य प्रवाहात आणल्याने आज विकासाच्या वाटा मोकळ्या झाल्या आहेत. बिरसा मुंडा हेच आदिवासी समाजाचे खरे शिल्पकार होत असे प्रतिपादन तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष माधव अमृतवाड यांनी मंगळवारी (ता. १५) केले आहे. आदिवासी समाजाचे महानायक स्वातंत्र्य सेनानी बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त शासकीय कार्यालयात प्रतिमा भेट देण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी तहसीलदार राजेश लांडगे, माजी सभापती शिवाजी देवतुळे, मारोती अंगरवाड,माजी सरपंच धोंडीबा देशमुख,राजु बुरकुले, साईनाथ गडापुरे, शेषेराव हूरदूके, गड्डमवार कीनीकर यांची उपस्थिती होती.अमृतवाड म्हणाले की,रानिवनात राहून आदिवासी समाज आपला उदरनिर्वाह चालवत होते. शासकीय योजना आणि समाजाची उन्नती करण्यासाठी कुणीच सरसावले नाही. दरम्यान क्रांतिकारक बीरसा मुंडा यांनी सामाजिक परिवर्तन घडवून समाजात जनजागृती केली.आज आदिवासी समाज स्वाभिमानाने जीवन जगत आहे.नव्यापीढिने थोरपूरूषाचा आदर्श घेऊन वाटचाल करावी तरच ख-या अर्थाने जयंती साजरी केल्याचे सार्थक होईल असे सांगितले. शहरात विविध ठिकाणी जंयती साजरी करून तहसील कार्यालयात बिरसा मुंडा यांची प्रतिमा भेट देण्यात आली.

# प्राप्तीकर विभागाची अबू आझमींवर धाड

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी सातत्याने केंद्र सरकारवर टीका चालवली होती. आजही सकाळी अबू आझमींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा 'नटवरलाल' म्हणून उल्लेख केला होता. तसेच, केंद्र सरकारच्या धोरणांवरही अबू आझमी यांनी हल्लाबोल केला. या पार्श्वभूमीवर आज दुपारच्या सुमारास अबू आझमी यांच्याशी संबंधित तब्बल ३० ठिकाणी प्राप्तीकर विभागानं धाडी टाकल्या आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना सुरूवात झाली आहे. मुंबईसह देशभरातील एकूण सहा शहरांमध्ये या धाडी टाकण्यात आल्या आहेत. अबू आझमी, त्यांचे निकटवर्तीय दिवंगत गणेश गुप्ता आणि त्यांच्या पत्नी आभा गणेश गुप्ता यांच्या काही मालमत्तांवर प्राप्तीकर विभागानं धाड टाकली आहे. बेहिशेबी मालमत्ता, गुंतवणूक आणि काळा पैसा यासंदर्भात या धाडी प्राप्तीकर विभागानं टाकल्याची माहिती समोर येत आहे. अबू आझमी समाजवादी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष असताना आभा गुप्ता या पक्षाच्या सचिव होत्या. या सगळ्या धाडींना आभा गुप्ता आणि अबू आझमी यांच्या कुलाब्यातील कमल मॅन्शनमधील कार्यालयांपासून सुरुवात झाली. देशभरातील एकूण ३० ठिकाणी ही कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये मुंबईसह वाराणसी, कानपूर, दिल्ली, कोलकाता आणि लखनौ या शहरांचा समावेश आहे. वाराणसीमधील विनायक निर्माण लिमिटेड या कंपनीवर प्राप्तीकर विभागानं धाड टाकली आहे. आभा गुप्ता यांनी त्यांची बेहिशेबी मालमत्ता या कंपनीत गुंतवल्याचा प्राप्तीकर विभागाला संशय आहे. शिवाय, कोलकात्यामध्ये धाड टाकण्यात आलेल्या कार्यालयाच्या ऑपरेटरचा वापर हवाला मार्गाने पैशांचे व्यवहार करण्यासाठी केला जात असल्याचाही विभागाला संशय आहे. याशिवाय, वाराणसीमधील विनायक रिअल इस्टेट या कंपनीवरही प्राप्तीकर विभागाला संशय असल्याची माहिती इंडिया टुडेनं सूत्रांच्या हवाल्याने दिली आहे.

# सरकारमधील वाचाळवीरांना अजित पवारांनी खडसावले

## यशवंतराव चव्हाण साहेबांनी घालून दिलेली महाराष्ट्राची परंपरा... घडी विस्कटवू नका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** तुमच्यामध्ये वाचाळवीरांचे मोठं प्रस्थ वाढले आहे. काही मंत्री बोलत आहेत त्यातून मंत्रीमंडळाची प्रतिमा खराब होत आहे. लोक ऐकून घेत असतात... पहात असतात ...लक्षात ठेवत असतात ...काहीजण सहज बोललो म्हणत आहेत... तुम्ही सहज बोलायला नागरीक नाही... तुम्ही राज्याचे प्रतिनिधी आहात, मंत्री आहात. तुम्ही शपथ घेतलेली आहे... तुमच्यावर एक जबाबदारी दिलेली आहे अशा शब्दात राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सरकारमधील वाचाळवीरांना खडसावले. आज जनता दरबार उपक्रमास आले असता विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. मध्यंतरी अब्दुल सत्तार हे माझी बहिण सुप्रिया हिला काही बोलले... विनाशकाले विपरीत बुद्धी... हेच त्यांना बोलले पाहिजे... काय आपण बोलतोय... मंत्री केलं म्हणजे वेगळे झाले का... मंत्री पदे येतात... जातात... कोण आजी... कोण माजी असतात. परंतु शेवटी आपण नागरीक आहोत संविधान... कायदा... नियम याचा सर्वांनी आदर करायचा असतो पण यामध्ये हे चुकत आहेत असे स्पष्ट मत अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केले. अंबरनाथमध्ये दोन गटात गोळीबार



करण्याची घटना बैलगाडी शर्यतीत घडली... बैलगाडी शर्यतीमध्ये दिवसाढवळ्या गोळीबाराची घटना घडतेय... सरकार काय करते?... ठाण्यात किसननगर भागात शिंदे - ठाकरे गटात राडा झाला अशी राडेबाजी करुन चालणार नाही...पोलिसांना बाकीच्यापेक्षा याच गोष्टीकडे लक्ष द्यावे लागेल. हे काय चालेल आहे असा सवालही अजित पवार यांनी सरकारला केला. किती लोकांना 'वाय प्लस' दर्जाची सुरक्षा पुरवली आहे याची माहिती माहितीच्या अधिकारात मागवली आहे असे सांगतानाच त्यांना खरंच 'वाय प्लस' दर्जाची सुरक्षा आवश्यक आहे का? ... काहींचा तर ३० - ३० सरकारी गाड्यांचा ताफा फिरत आहे. मी उपमुख्यमंत्री होतो जास्त गाड्या असल्या की नको सांगत होतो. हा पैसा तुमचा नाहीय... सरकारकडे टॅक्स रुपाने आलेला आहे. ज्या आमदाराला कुठल्याही पक्षाच्या बंदोबस्त द्यायचा असेल तर जरुर द्या आणि तो दिलाही पाहिजे त्यांचे व नागरीकांचे संरक्षण करणे, महाराष्ट्रातील शेवटच्या जनतेचे संरक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. परंतु सरसकट सगळ्यांना? ... काही माजी नगरसेवकांना सरकारी संरक्षण... कोण त्याला काय करतंय... तो माजी झाला ना... त्याने गंभीर चुका केल्या असतील तर तो निस्तारेल... त्यासाठी सरकारी यंत्रणांचे संरक्षण देण्याची काय आवश्यकता असा संतप्त सवालही अजित पवार यांनी केला. माझा पाच दिवसाचा परदेशातील कार्यक्रम फार पूर्वी ठरला होता तो रद्द करता आला नाही. शिर्डीतील शिबीराला एक दिवस उपस्थित राहून गेलो मात्र एवढया दिवसात मी प्रेस समोर आलो नाही तर अजित पवार कुठे गेले आहेत. अजित पवार उपलब्ध नाहीत. अजित पवार नाराज... फारच प्रेम आमच्यावर ऊतू जातं.. अशा काही बातम्या येत होत्या. जे काही आहे ते मी स्पष्टपणे सांगत असतो. राजकारणात असल्यामुळे लोकांमध्ये काम करत असताना अशा गोष्टी लपवून ठेवणे चालत नसते. मात्र चार - पाच दिवसात ज्या काही घटना घडल्या त्यावेळी मी इथे नव्हतोच. त्यामुळे स्टेटमेंट आले नाही असा खुलासा रोज येणाऱ्या बातम्यावर अजित पवार यांनी केला. विरोधी पक्षनेता म्हणून नागरीक म्हणून सरकार आल्यापासून कसे काम सुरू आहे सरकार कसे आले या खोलात जात नाही. ४० आमदार कसे फुटले आणि पुढच्या घडामोडी आता ते प्रकरण कोर्टात सुरु आहे. त्यावेळेपासून प्रशासन पाहिजे असे काम करताना दिसत नाही. सुरुवातीला बराच काळ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री या दोघांवर राज्याचा लोढ होता. त्यानंतर मंत्रीमंडळ विस्तार केला १८ लोकांचा समावेश केला. २० लोकांचे मंत्रीमंडळ आहे. मी अनेक वर्षाच्या म्हणजे ३२ वर्षाच्या कारकीर्दीत वेगवेगळ्या महत्त्वाच्या खात्यावर, उपमुख्यमंत्री म्हणून काम केले आहे. बैठका कशा घेत होतो. वेळेवर बैठका होत होत्या. बैठका रद्द होत नव्हत्या अधिकाऱ्यांना ताटकळत बसावे लागत नव्हते परंतु आता तसं अजिबात होत नाही. पोलीसांचे चांगले प्रशासन म्हणून जगभर ओळख आहे परंतु या सरकारच्या काळात राज्यात पोलीस तणावाखाली काम करत आहे असेही अजित पवार यांनी सांगितले.

मुंबई आणि परिसरात गोवर रोगाची साथ जोरात आहे. राज्यसरकारचा आरोग्य विभाग काय उपाययोजना करतोय. तो यामध्ये कमी पडत आहे. त्यांनी घरोघरी जाऊन काम करण्याची आवश्यकता आहे. कोरोना काळात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे सतत संपर्कात होते हेही आवर्जून सांगितले. सत्ताधारी पक्षाचे वरिष्ठ नेते सांगत आहेत की, आता महागाईवर बोलून उपयोग नाही. दहा वर्षांपूर्वी ४० हजाराचा मोबाईल हा ४ हजारात मिळतो याचा अर्थ महागाई कमी झाली आहे. असा दावा आहे किती हास्यास्पद दावा आहे हा... आजदेखील फोन कुठल्या कंपनीचा आहे तो लाखभर रुपये आहे. महागाईवर थातूरमातूर उत्तर देत आहेत असा जोरदार टोला अजित पवार यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्यावर बोलताना लगावला.

# भारताने दबाव झुगारला

आधुनिक केसरी

कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा कार्यक्रमावर विकसनशील देशांना आपली भूमिका मांडण्यास बाध्य करण्याचा विकसित देशांचा प्रयत्न भारताने उधळून लावला. याप्रश्नी संयुक्त राष्ट्रांच्या इजिप्तमधील हवामान परिषदेत भारताने ठाम भूमिका मांडून आत्तापर्यंत झालेल्या हवामान बदलाबाबत विकसित राष्ट्रांना आरसा दाखवत चीन, पाकिस्तानसह अनेक देशांची मोट बांधत हा प्रस्ताव धुडकावला. जगात सर्वाधिक कार्बन उत्सर्जन करणाऱ्या २० विकसनशील देशांनी भविष्यकालीन उद्दिष्ट निश्चित करावे, यासाठी हवामान परिषदेत अमेरिकेसह विकसित देशांनी प्रस्ताव आणला होता. यानुसार संबंधित २० देशांनी कार्बन उत्सर्जन कमी करण्याबाबत ठोस कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, भारताने चीन, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ व भुतान या देशांच्या साथीला घेत हा प्रस्ताव अमान्य केला. पॅरिस करारामध्ये पुन्हा दुरुस्ती करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आक्षेप घेत आत्तापर्यंत झालेल्या हवामान बदलांसाठी विकसनशील देशांना जबाबदार धरण्याचा हा प्रयत्न असल्याचे ठाम मत भारताने यावेळी मांडले. गेल्या वर्षीच्या ग्लास्गो परिषदेत सन २०३०पर्यंत कार्बन उत्सर्जन ४५ टक्के कमी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला होता. त्यासाठी सन २०१०च्या कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण गृहित धरण्यात आले होते. याद्वारे पृथ्वीची तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्याचेही लक्ष्य निर्धारित करण्यात आले होते. मात्र तंत्रज्ञान व आर्थिक साह्य न देताच विकसनशील देशांनी हा कार्यक्रम राबवण्याच्या श्रीमंत देशांच्या या प्रस्तावावर भारत, चीनसह इतर विकसनशील देशांनी तीव्र आक्षेप नोंदवला. 'पॅरिस करारान्वये निश्चित करण्यात आलेल्या ध्येयामध्ये बदल करण्याचा प्रयत्न मान्य होऊ शकत नाही. नवे तंत्रज्ञाननिर्मिती, तंत्रज्ञानाचे हस्तांतरण याद्वारेच कार्बन उत्सर्जन कमी करण्याबाबतचा कालबद्ध कार्यक्रम आखता येईल', असे म्हणणे यापूर्वीच भारताच्या पर्यावरण मंत्रालयाने मांडले होते. सन १८५०पासून अमेरिकेने ५०९ गिगाटनहून अधिक कार्बन वातावरणात सोडला आहे. हे प्रमाण आत्तापर्यंतच्या एकूण जागतिक उत्सर्जनाच्या २० टक्के असल्याची आकडेवारी सांगते. चीन ११ टक्क्यांनिशी दुसऱ्या क्रमांकावर, तर सात टक्के उत्सर्जनास कारणीभूत असणारा रशिया तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारत या यादीत ३.४ टक्क्यांनिशी सातव्या क्रमांकावर आहे.

# महाराष्ट्रात 'मित्र' येणार !



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात 'मित्र ' येणार ! हे वाक्य वाचून तुम्हाला आश्चर्य वाटलं असणारचं ! हो, हे मात्र खर आहे. महाराष्ट्रात मित्र येणार आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी आता मित्र धावून येणार आहे. महाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोलासह पायाभूत सुविधा, कृषी,आरोग्य, शिक्षण, कौशल्य, पर्यटन, क्रीडा विकासाठी नीती आयोगाच्या धर्तीवर राज्यात 'मित्र' संस्थेची स्थापना होणार आहे. शासनाने नुकतीच याला मंजुरी दिली आहे.**

नीती आयोगाच्या धोरणाशी सुसंगत, मात्र राज्याच्या गरजांची दखल घेत खासगी क्षेत्र आणि अशासकीय संस्थांच्या सहभागाद्वारे राज्याचा जलद आणि सर्वसमावेश विकास करणे हा 'मित्र'च्या स्थापनेमागील उद्देश आहे. इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफर्मेनशन असे या संस्थेचे नाव असणार आहे. मित्र ही संस्था शेती, आधुनिक तंत्रज्ञान, ब्लॉकचेन आणि दळणवळण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचे काम करेल.

केंद्र सरकारने भारताच्या अमृत मोहोत्सवानिमित्त म्हणजे २०४७ पर्यंत भारताला विकसीत देश करण्याचा संकल्प केलाय. यासाठी भारतीय अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलर्सची करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. यामध्ये २०२५-२६ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलयन डॉलरपर्यंत नेण्याचे उदिष्ट जाहीर केले आहे. तेसेच २०३०पर्यंत शाश्वत विकासाचे उदिष्ट देखील साध्य करण्याचा भारत सरकारचा मानस आहे. विकसीत भारताची उदिष्टे साध्य करताना भारतातील सर्व राज्यांना देखील विकसीत करणे सरकारचे उदिष्ट आहे. आहे. या दृष्टीने महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०२७ पर्यंत एक ट्रिलियन डॉलर्स तर २०४७पर्यंत ३.५ ट्रिलिय डॉलर करण्याचे राज्याचे उदिष्ट आहे. त्यासाठीच नीती आगोगाच्या धर्तीवर राज्यात देखील मित्र या संस्थेची स्थापणा करण्यात येणार आहे.

राज्याचा विकास जलग गतीने होण्यासाठी मित्र ही संस्था सरकारी मालमत्तांचे निर्गुंतवणुकीकरण, कृषी क्षेत्रात ब्लॉकचेन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरत, दळणवळण अशा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये काम करेल. महाराष्ट्राचा प्रादेशिक विकास व्हावा यासाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यात आली.खर तर ही सर्व कामे या मंडळांना करायची होती.देशाचं दुर्दैव म्हणा की महाराष्ट्राचं मात्र मत सुरक्षित राखण्यासाठी राजकारण्यांनी विकासाची अथांग योजना आणल्या.मात्र त्या योजनांची अंमलबजावणी झाली नसल्याने पायाभूत सुविधांसह आरोग्य,शिक्षण,पर्यटन विकास होवू शकला नाही.

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल संपूर्णपणे दूर करण्यात येईल, असे आश्वासन प्रत्येक राज्यकर्त्याने दिले होते. मात्र ही आश्वासने दुर्दैवाने पूर्ण होऊ शकली नाहीत. महाराष्ट्राचा समतोल विकास व्हायचा असेल, तर विकासाच्या अनुशेषाचा प्रश्न सोडवावाच लागणार आहे. १९५६ मध्ये मराठवाडा द्विभाषिक मुंबई राज्यात सामील झाला आणि १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्रात आला. 'नागपूर करारातील ज्या शर्ती मराठवाड्याला उद्देशून आहेत, त्या सर्व शर्तींचे पालन केले जाईल. एवढेच नव्हे तर शक्य असेल तिथे त्याहूनही अधिक झुकते माप मराठवाड्याच्या पदरात टाकले जाईल', असे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आश्वासन दिले होते. मात्र दुर्दैवाने महाराष्ट्र शासनाकडून पुढील काळात नागपूर कराराचे पालन झाले नाही. जर नागपूर कराराचे पालन प्रामाणिकपणे केले असते, तर राज्यातील वैधानिक विकास मंडळे (वैधानिक हा शब्द आता वगळण्यात आला आहे) स्थापन करण्याची आवश्यकता भासली नसती.वैधानिक विकास मंडळे स्थापन होवूनही महाराष्ट्रतील प्रत्येक जिल्हा विकासापासून दूर आहे.प्रादेशिक असमतोल वाढत आहे. पायाभूत सुविधांसह कृषी,आरोग्य,शिक्षण,कौशल्य, बांध काम क्षेत्र,पर्यटन क्रीडा क्षेत्र विकासापासून दूर आहे.

कोविड-१९ साथीच्या आजाराने पुन्हा भारतीय राज्यांमधील 'असंतुलित' प्रादेशिक विकासाकडे लक्ष वेधले आहे. अशा स्थितीत मोठी औद्योगिक राज्ये बुडीत अर्थव्यवस्थेतून सावरत असताना विकासाची तीच जुनी मॉडेल्स आता राबवता येणार नाहीत, याची काळजी सरकारने घेण्याची गरज आहे. नुकत्याच झालेल्या एका अभ्यासानुसार, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडू सारखी भारतातील समृद्ध राज्ये उत्पादन आणि उच्च तंत्रज्ञान सेवांवर कशी अवलंबून आहेत. त्यांच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे योगदान केवळ १०-१५ टक्के आहे.

पण आर्थिक विषमता ही या कथेची फक्त एक बाजू आहे. याची दुसरी बाजू म्हणजे राज्यांमधील, जिल्ह्यांमधील व्यापक




असमानता, जी त्यापेक्षा कितीतरी जास्त आहे.

भारतातील आर्थिक असमानतेची कोणतीही चर्चा, सर्वसाधारणपणे, दोन पैलूंपुरती मर्यादित आहे - १) भारतातील प्रमुख राज्यांमधील दरडोई उत्पन्नाची तुलना आणि २) विविध क्षेत्रांमधील उत्पन्नाचे वितरण (जसे की कृषी, उद्योग आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेत कृषी. सेवांचे योगदान). विविध राज्यांमधील प्रादेशिक असमानतेकडे कमी लक्ष दिले गेले आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक सारखी समृद्ध राज्ये एकूण राज्यस्तरीय सकल देशांतर्गत उत्पादनाच्या बाबतीत चांगली कामगिरी करतात, परंतु ही प्रगती राज्यांमध्ये एकसमान नाही. राज्याच्या अर्थव्यवस्थेत मुंबईचे योगदान सर्वात मोठे आहे. राज्याच्या उत्पादनात एकट्या मुंबईचा वाटा एक पंचमांश आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की पहिल्या तीन जिल्ह्यांचा (मुंबई, ठाणे आणि पुणे) राज्याच्या अर्थव्यवस्थेत जवळपास निम्मे योगदान आहे. आर्थिक उपक्रम राज्याच्या पश्चिम भागापुरते मर्यादित आहेत. गेल्या दहा वर्षांपासून हा ट्रेंड सुरू आहे. हे तिन्ही जिल्हे भौगोलिकदृष्ट्या एकमेकांशी जोडलेले असून पश्चिम घाटावर वसलेले आहेत हे येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. राज्याच्या पूर्वेकडील सर्वात महत्त्वाचा जिल्हा असलेल्या नागपूरचा महाराष्ट्राच्या एकूण उत्पन्नात केवळ ५ टक्के वाटा आहे.

कर्नाटक राज्यात ही विषमता अधिक दिसून येते १९९९-२००० मध्ये बेंगळुरू (शहरी) राज्याच्या उत्पन्नात एक पंचमांश पेक्षा जास्त योगदान दिले. राज्याच्या अर्थव्यवस्थेत केवळ ५ टक्के योगदान देणारा बेळगाव जिल्हा खूप मागे आहे. २००८-१०दरम्यान, अवघ्या दहा वर्षांत, बेंगळुरू (शहरी) ने एक तृतीयांशपेक्षा जास्त योगदान दिले. हे सूचित करते की कर्नाटकच्या उत्पन्नात वाढ मुख्यत्वे त्याच्या राजधानी जिल्ह्याच्या कामगिरीमुळे झाली आहे, जेथे या काळात आयटी-आधारित सेवा क्षेत्राची झपाट्याने वाढ झाली.

**तामिळनाडूचा तुलनेने संतुलित विकास**

महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या तुलनेत तामिळनाडूने निवडलेले विकासाचे मॉडेल अधिक 'संतुलित' असल्याचे दिसून येते. राज्याच्या अर्थव्यवस्थेतील राज्याच्या दोन सर्वात मोठ्या जिल्ह्यांचे (चेन्नई आणि कोईम्बतूर) योगदान पाचव्या भागापेक्षा थोडे कमी आहे. येथे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की राजधानी चेन्नई हे राज्याच्या पूर्व भागात आहे, तर कोईम्बतूर राज्याच्या पश्चिम भागात आहे. हे देखील दिसून येते की गेल्या काही वर्षांपासून त्यांच्या सहभागामध्ये एक उलट प्रवृत्ती आहे. पुढील दोन जिल्हे (थिरुवल्लूर आणि कांचीपुरम) वाढत्या कल दर्शवतात. यावरून हे राज्यातील उदयोन्मुख जिल्हे असू शकतात, असे सूचित होते.

स्रोतः HTTPS://DATA.GOV.IN/

हे विश्लेषण महत्त्वाचे का आहे, सरकार काय करू शकते

महाराष्ट्र आणि कर्नाटकातील जिल्ह्यांवर नजर टाकल्यास असे दिसून येते की आर्थिक विकास मुख्यत्वे राज्याच्या काही निवडक भागात, राजधानी आणि त्याच्या लगतच्या जिल्ह्यांमध्ये केंद्रित आहे. महत्त्वाचे म्हणजे राज्याच्या उत्पादनात जिल्ह्यांचे असमान योगदान दीर्घकाळ असेच राहिले आहे, यावरून राज्यांचा अंतर्गत विकास भौगोलिकदृष्ट्या 'असंतुलित' झाल्याचे दिसून येते. दुसरीकडे, तामिळनाडू राज्याने जिल्ह्यांमधील विषमता फार मोठी होऊ दिलेली नाही.

या निष्कर्षांचे धोरणासाठी महत्त्वाचे परिणाम आहेत. श्रीमंत राज्यांमध्येही प्रादेशिक आर्थिक विषमता दिसून येते. एखाद्या राज्याची आर्थिक प्रगती किंवा समृद्धी सहसा राजधानी जिल्ह्याभोवती केंद्रित असते. अशा परिस्थितीत, राज्याच्या प्रगतीमध्ये प्रत्येक जिल्हा किंवा प्रदेश समान प्रमाणात सहभागी होऊ शकतो याची खात्री करण्यासाठी राज्य सरकारांच्या सक्रिय हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. अन्यथा, तुलनेने कमी विकसित प्रदेश स्वतःला वेगळे वाटू शकतात. अशा स्थितीत परिस्थिती अशा टोकाला जाऊ शकते की हे दुर्लक्षित भागही वेगळ्या राज्याची मागणी करू शकतात. उदाहरणार्थ, पूर्व महाराष्ट्रातील विदर्भाच्या मागणीत वेळोवेळी भर पडत राहते. यावर एक उपाय असा होऊ शकतो की राज्यांमध्ये तुलनात्मक फायद्याच्या आधारावर जिल्ह्यांचा विकास करून देशांतर्गत निर्यातीसाठी मालाची निर्मिती केली जावी. भारतासारख्या देशात हे दिवास्वप्न नाही, जिथे अजूनही बरीच आर्थिक सत्ता सरकारच्या हातात आहे, विशेषतः उत्पादनाच्या बाबतीत.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था भारतातील सर्वात मोठी आहे. राज्याच्या २०२०-२१ या वर्षातील एकूण उत्पन्नामध्ये कृषी, सेवा आणि उद्योग क्षेत्राचा वाटा अनुक्रमे १३.२%, ६०% आणि २६.८% आहे. राज्याच्या गरजा लक्षात घेऊन खाजगी क्षेत्र आणि अशासकीय संस्थांच्या सहभागातून राज्याचा जलद आणि व्यापक विकास साधण्यासाठी मित्रची स्थापना करण्यात आली आहे. राज्य सरकार, केंद्र सरकार, निती आयोग, नागरी संस्था, अशासकीय संस्था आणि खाजगी व्यावसायिक संस्थेशी समन्वय साधून मित्र संस्थेचे काम केल्या जाणार आहे. मित्र संस्था लघु उद्योग, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, सहायक सेवा आणि दळणवळण या पारंपारिक क्षेत्रांवर विशेष भर देणार आहे.

# आजची युवापिढी संस्कार, संस्कृती विसरली की काय ?



बाबा चन्ने
धोंदलगाव, ता. वैजापूर

आधुनिक केसरी

**आज न्यूज चॅनल, दैनिकं, सोशल मिडीया बघितली की मन सुन्न होतं. दिल्लीत एका युवकाने प्रियसीचे ३५ तुकडे करून फ्रीजमध्ये ठेवले, औरंगाबाद जिल्ह्यातील एका तरुणाने प्रेयसीचे मुंडके तोडून धड वेगळे केले. एका तरूणाने प्राध्यापक वडीलांचा धारदार शस्त्राने खून केला. प्रियकराच्या मदतीने पतीचा काढला काटा काढला. अनैतिक संबंधात प्रियसीचा मुलगा आड येतोय म्हणून प्रियकराने मुलाचा खून केला. प्रेमविवाह केला म्हणून भावाने बहीणीचे मुंडके उडविले. किती थरकाप उडविणाऱ्या घटना आहेत या. मला तरी वाटतं याला सर्वात महत्वाचे म्हणजे संस्कारशुन्य पिढी. म्हणून माझ्यासारख्या माणसाला वाटते, आजची युवापिढी जणू संस्कार, संस्कृती विसरली की काय मुलांना चांगल्या संस्कारांची गरज आहे. ते संस्कार तरी कसे मिळतात. ते केव्हा द्यायचे हा ही महत्वपूर्ण प्रश्न आहे.**

ज्याप्रमाणे कुंभार मातीच्या गोळ्याला आकार देऊन मडकं बनवतो. तसेच मुलाचे पण असते. मानसशास्त्राच्या नियमानुसार मुलाला चौदा वर्षाच्या आत संस्कार देणे आवश्यक असते. चौदा वर्षाच्या पुढे वय झाल्यानंतर मुलगा ऐकण्याच्या मनस्थितीत नसतो. असे मानसशास्त्राचे नियम सांगतात. चौदा वर्षाच्या आतच मुलांवर चांगल्या किंवा वाईट विचाराचा पगडा पडतो. आणि तो आयुष्यभर तसाच राहतो.

ज्याप्रमाणे राजमाता जिजाऊंनी बाल शिवबाला गर्भावस्थेत असल्यापासून त्यांच्यावर सुसंस्कार करण्याचे काम केले. लहानपणी प्रभू श्रीरामाच्या, कृष्णाच्या गोष्टी सांगितल्या, लहानपणापासून शिवबाला सुसंस्कृत, मुत्सदी, शूर, राजा बनवायचे संस्कार दिले.

वरीलप्रमाणेच आपणही आपल्या मुलांना लहानपणापासून सुसंस्कार देण्याची गरज आहे. जो मुलगा बाल्यवस्थेत रामायण समजून घेतो. तो नक्कीच मोठा झाल्यानंतर एक आगळावेगळा माणूस झाल्याशिवाय राहत नाही. रामायणाचे अनुकरण करणारा माणूस कधीच कोणाला फसवू शकत नाही, धोका देऊ शकत नाही. त्यामुळे बालपणात मुलांना प्रभू श्रीरामाचे संस्कार देणे महत्त्वाचे आहे.

आज विज्ञानाचे जेवढी प्रगती केली. तेवढ्याच प्रमाणात जनजीवन व्यस्त झालेले दिसत आहे. माणूस पैसे कमवायच्या नादात आपलं जगणंच विसरला आहे. विभक्त कुटुंबपद्धतीमुळे आईवडील एवढे व्यस्त असतात. त्यांना आपल्या मुलांसोबत बोलायला देखील वेळ नसतो. त्यामुळे मुलं संस्कारापासून वंचित राहतात.

तसेच महिलांनी गर्भावस्थेत असतांना राजे, महाराजे, संत, समाजसेवक यांचे चरित्र वाचायला पाहीजे. तसे न करता महिला चित्रपट, मालिका बघतात. त्यामुळे होणाऱ्या बालकावर वेगळेच संस्कार होतात. १४ व्या वर्षी छत्रपती संभाजी महाराजांनी 'बुधभुषणम्' नावाचा संस्कृत भाषेतील महत्वाचा ग्रंथ लिहिला. संत ज्ञानेश्वर महाराजांनी १६ व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. आमची मुलं मात्र १६ व्या वर्षी व्यसनाधीन होतात. बियर बार व हुक्का पार्लरमध्ये जातात. आणि आयुष्याचे वाटोळे करून घेतात. सगळीच मुलं अशी असतात. असे माझे अजिबात मत नाही. परंतु अनेक मुलं असेच असतात. या विचारावर मी ठाम आहे. बारमध्ये रात्री १७ ते २५ या वयोगटातील जास्त मुलं असतात हे वास्तव आहे. व्यसनापासून माणूस क्रूर बनतो, आणि आपोआपच अनर्थ घडतो.

आजच्या युवकांना बाप्पा रावळ, पृथ्वीराज चौहान, महाराणा हम्मीर, महाराणा प्रतापसिंह, महाराणा रतनसिंह, महाराणा राजसिंह, छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज, गुरू गोविंदसिंह, शहीद भगतसिंह, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा महापुरूषांच्या विचारांची आवश्यकता आहे. परंतु आजच्या युवकांना संस्कृतीचा विसर पडलेला असून त्यांना सुसंस्काराची अत्यंत आवश्यकता आहे. योग्यवेळी जर त्यांना सुसंस्कार मिळाले नाही तर दिवसेंदिवस वृध्दाश्रमाची संख्या वाढत जाईल. समाजात अस्थिरता निर्माण होईल. खूनाचे प्रमाण वाढेल, यात तीळमात्र ही शंका नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सत्यशोधक लहुजी साळवे आणि म. फुले : एक शोध



डॉ. मारोती द. कसाब
संपर्क क्र. 9822616853

आधुनिक केसरी

**भारतातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेने अस्पृश्य ठरविलेल्या महाराष्ट्रातील महार, मांग, ढोर, चांभार या जात समूहांचे उद्धारक म्हणून महात्मा फुले यांना ओळखले जाते. महात्मा फुले यांच्या आधी अशाप्रकारे अस्पृश्यांचा कळवळा घेऊन कुणी त्यांच्यासाठी मोठ्या प्रमाणात काम केल्याचे आढळून येत नाही. म्हणूनच अस्पृश्य जातीत जन्मलेले महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा गौतम बुद्ध, महात्मा कबीर यांच्या सोबतच महात्मा जोतीराव फुले यांनाही गुरु मानले होते. बाबासाहेबांनी महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानून, महात्मा फुले यांनी अस्पृश्यांच्या उद्धारार्थ केलेल्या कार्याचा गौरवच केलेला दिसून येतो. त्यांच्याप्रतीची कृतज्ञता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केली आहे.**

आपल्या संपूर्ण हयातीत महात्मा फुले यांनी स्त्री शूद्रांसह अस्पृश्यांना केंद्रस्थानी मानून त्यांच्या उद्धाराची चळवळ अत्यंत डोळसपणे चालविली. महात्मा फुले यांनी अनेक ग्रंथांचा अभ्यास करून भारतातील अस्पृश्यतेची पाळेमुळे शोधून काढली. 'अस्पृश्यांची कैफियत' त्यांनी जगापुढे मांडली. गुलामगिरी, सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक, ब्राह्मणांचे कसब आणि अखंड आदि काव्य लेखनातून महात्मा फुले यांनी अस्पृश्य हे मूळचे अस्पृश्य नसून ते या देशाचे स्वामी आहेत, मालक आहेत, मूळ रहिवासी आहेत हे परोपरीने इतिहासाचे दाखले देऊन, संदर्भ देऊन सिद्ध केले आहे. इ. स. १८६९ साली प्रकाशित झालेले आपले ' ब्राह्मणांचे कसब ' हे पुस्तक महात्मा फुले यांनी 'महाराष्ट्र देशांतील कुणबी, माळी, मांग, महार यांस परम प्रीतीने नजर' केले आहे. ( म. फुले समग्र वाङ्मय', पृ. ८६)

महात्मा फुले यांना गुलामगिरीची प्रचंड चीड होती. गुलामगिरी नष्ट करण्यासाठी त्यांनी आपल्या जीवाचे रान केले. 'गुलामगिरी' या आपल्या पुस्तकाच्या सुरुवातीलाच त्यांनी अर्पण पत्रिका लिहिली असून हे पुस्तक त्यांनी ' युनायटेड स्टेट्स मधील ज्या सदाचारी लोकांनी गुलामांना मुक्त करण्याच्या कामात निरपेक्ष व परोपकार बुद्धी दाखविली त्यांच्या सन्मानार्थ नजर केले आहे. ' ( 'म. फुले समग्र वाङ्मय', पृ.११५)

महात्मा फुले यांचे घर पुण्यात ज्या पेठेत होते, त्यांच्या बाजूलाच मीठ गंज , वेताळ पेठ ही मांग महारांची वस्ती होती. महात्मा फुले यांनी बालपणीच मांग महार यांचे दुःख जवळून पाहिले होते. त्या काळात पुण्यात पेशवाईचे नियम अत्यंत कठोर होते. मांग महारांना दिवसा पुण्यात फिरता येत नसे. एखादा मांग महार रस्त्यावर आलाच ; तर त्याला गळ्यात गाडगे आणि कमरेला झाडू बांधून यावे लागे. अन्न पाण्यावाचून अनेक मांग महार पाय खोरून मरत असत. त्यांना कोणी पाणीही प्यायला देत नसे. हे पाहून बाल जोतीचे मन तळमळत असे. त्यांचे सुरुवातीचे मित्र ब्राम्हण जात वर्गातून आलेले होते. अशाच एका ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या वरातीत ' तू माळी, शूद्र असून आमच्या वरातीत का आला? ' असे म्हणत जोतीरावांचा वरातीतील लोकांनी अपमान केला. वरातीत अपमान झाल्यापासून जोतीरावांनी शरीर सामर्थ्यवान बनविण्यासाठी शारीरिक शिक्षण घ्यायचे ठरवले. त्या काळात पुण्यात लहुजी वस्ताद साळवे ( जन्म- इ.स. १७९४) यांचे तालीम, आखाडे प्रसिद्ध होते. वेताळ पेठेतील लहुजींच्या घराजवळ असलेल्या तालमीत जोतीराव हे त्यांचे मित्र सदाशिव बल्लाळ गोवंडे यांच्या सोबत सामील झाले. यासंदर्भात धनंजय कीर लिहितात, ' जोती व गोवंडे हे उत्साही, महत्त्वाकांक्षी आणि उद्योगी तरुण होते. शिवाजी आणि वॉशिंग्टन यांची चरित्रे त्यांनी अभ्यासली होती. भावी काळातील कष्टमय जीवन प्रवासासाठी आणि स्वतःच्या महान ध्येयसिद्धीसाठी आपले शारीरिक सामर्थ्य तितकेच कणखर आणि खणखणीत असणे आवश्यक आहे, हे जाणून ते विविध प्रकारचे मर्दानी खेळ खेळत. तलवार, दांडपट्टा व निशानेबाजी यात ते चांगलेच तरबेज झाले. लहुजी बुवा मांग हे अस्पृश्य समाजातील गृहस्थ या दोघांचे या क्षेत्रातील गुरुजी होते. सैनिकी शिक्षणाचे लहुजी हे एक आदर्श गुरुजी होते. त्यांच्या तालमीत जोतीने शिक्षणात इतकी मोठी प्रगती केली की, तो जेव्हा दांडपट्टा फिरवी, तेव्हा त्याचे कौशल्य पाहण्यास लोकांची झुंबड उडत असे. एक उत्कृष्ट व्यायाम पटू म्हणून जोतीची पुण्यात ख्याती झाली होती. लहुजी बुवा हे तडफदार व देशाभिमानी असे व्यक्तिमत्त्व. तरूणांचे एक कळकळीचे मार्गदर्शक होते' ( कीर, पृष्ठ क्रमांक - १६)

महात्मा फुले यांचे मूळ घराणे सातारा जिल्ह्यातील कटगुण येथील होते. त्यांचे आधीचे आडनाव 'गोऱ्हे' असे होते. ते वतनदार चौगुले होते. त्यांनी भरपूर संपत्ती जमा केल्यामुळे गावातील कुलकर्ण्यांशी त्यांचे वाकडे आले. मनुस्मृतीच्या नियमानुसार पेशवाईमध्ये शूद्रांना संपत्ती जमा करण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे झालेल्या भांडणात एका कुलकर्ण्यांची मान तलवारीने छाटून जोतीरावांचे पणजोबा गाव सोडून पुण्याजवळच्या खानवडी येथे राहायला आले. (पाटील, पृष्ठ क्रमांक- १७)

महात्मा जोतिराव फुले यांचा जन्म इ.स.१८२७ साली झाला. ते अवघे नऊ महिन्यांचे असताना आई चिमणाबाईंचे निधन झाले. पुण्यात इंग्रजी मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या शाळेत वडील गोविंदरावांनी जोतीरावांना घातले. मात्र " तुमच्या मुलांना शाळेत बसवून तुमचे उद्योग धंदे बुडवावे, असा इंग्रज सरकारचा डाव आहे. तुम्ही आपले उद्योग धंदे सोडून मुलांना शाळेत घालू नका. या मुलाला शाळेत घालून ऐदी बनविण्यापेक्षा बागेत काम करावयास शिकवा; म्हणजे हा तुमचे व कुटुंबाचे पुढे उत्तम पोषण करील" अशी त्या भोळ्या व



सरळ मनाच्या गृहस्थाची समजूत घालण्यात आल्यामुळे गोविंदरावांनी जोतीला शाळेतून काढून बागेचे कामात घातले.' ( पाटील, पृष्ठ क्रमांक- १९) गोविंदरावांच्या बागे शेजारी राहणाऱ्या गफार बेग मुन्शी आणि मिस्टर लिजीट साहेबांनी जोतीराव व गोविंदराव या दोघांनाही शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. त्यामुळे पुन्हा जोतीराव शाळेत जाऊ लागले. त्यांच्या सोबत त्यांचे मित्र सदाशिव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर व सखाराम यशवंत परांजपे हे ही होते. शाळेतील अभ्यासाबरोबरच ते शारीरिक शिक्षण घेण्याकडे ही वळले. महात्मा फुले यांचे आद्य चरित्रकार पंढरीनाथ सीताराम पाटील यांच्या मते जोतीरावांनी इ. स. १८४१ मध्ये मुन्शी गफार बेग आणि मिस्टर लिजीट साहेबांच्या सांगण्यावरून दुसऱ्यांदा शाळेत प्रवेश घेतला आणि त्याच वर्षी ते आपल्या तिन्ही मित्रांसमवेत लहुजींच्या तालमीत दाखल झाले. जोतीराव पहिल्यांदा शिष्य म्हणून लहुजींना भेटले तेव्हा ते १४ वर्षांचे होते; तर लहुजींचे वय तेव्हा ४७ वर्षे होते. पंढरीनाथ पाटील पुढे लिहितात ," त्यावेळी पुण्यांत लहुजी बुवा या नांवाचा एक मांग जातीचा गृहस्थ या कामीं मोठा नामांकित व तरबेज असा होता. त्याचे जवळ ही मंडळी दांडपट्टा, ढाल-तलवार, गोळीबार वगैरे कामें शिकली." ( पाटील पृष्ठ क्रमांक- २१) लहुजी साळवे यांचे घराणे क्रांतिकारकांचे होते. त्यांना शुरविरांची परंपरा लावलली होती. इंग्रजांशी लढताना लहुजींचे वडील राघोजी हे शहीद झालेले होते. लहुजींनी आजन्म अविवाहित राहून समाज क्रांती करण्याचे ठरविले होते. लहुजींची तालीम किंवा व्यायाम शाळा हा नुसता पैलवानांचा आखाडा नव्हता; तर त्याठिकाणी देश प्रेमाने भारावलेले सदाशिव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर, सखाराम यशवंत परांजपे आणि जोतीरावांसारखे विद्यार्थी हे दररोज सकाळ संध्याकाळी एकत्र येत असत. लहुजी बाबा त्यांना छत्रपती शिवरायांच्या आणि त्यांच्या मावळ्यांनी गाजवलेल्या पराक्रमाच्या कथा सांगत असत. कारण लहुजींच्या घराण्याला छत्रपती शिवाजी राजांनी स्वतः ' राऊत ' ही पदवी सन्मानपूर्वक बहाल केलेली होती. लहुजींचे पूर्वज शिवरायांच्या किल्ल्याचे संरक्षक होते. स्वराज्याच्या स्थापनेत त्यांनी आपला पराक्रम गाजवलेला होता. लहुजी आपल्या पठ्ठ्यांमध्ये देश प्रेमाबरोबरच स्वाभिमान आणि सामाजिक जाणीव निर्माण करीत होते. त्यामुळे शारीरिक शिक्षणाबरोबरच गुरुवर्य लहुजी बाबांकडून जोतीरावांसह सर्व विद्यार्थ्यांना व्यावहारिक, सामाजिक ज्ञानही मिळत असे. लहुजींच्या तालमीत देश- काल- परिस्थितीवर गुरु-शिष्यांच्या प्रदीर्घ चर्चा होत असत. देशासाठी युवकांनी काय केले पाहिजे ? कोणत्या गोष्टीला प्राधान्य दिले पाहिजे ? देशातील युवकांना कशा प्रकारचे शिक्षण मिळाले पाहिजे ? आणि देशावरचे इंग्रजी संकट कसे हटवले पाहिजे ? अस्पृश्यांची आणि स्त्रियांची दुःखद स्थिती कशी बदलली पाहिजे ? असे एक ना अनेक प्रश्न त्या ठिकाणी चर्चेला येत. त्याचबरोबर आधी इंग्रजांना घालवायचे की आधी देशात सामाजिक समता निर्माण होण्यासाठी सुधारणा घडवून आणायच्या ? यावरही तिथे विचार विनिमय होत असे. लहुजी आणि जोतिबांचे असे तर्कशुद्ध संवाद होत असत आणि त्यातूनच जोतीरावांनी आपल्या सामाजिक क्रांतीची सुरुवात करण्यासाठी स्त्री शूद्रातिशूद्रांसाठी शिक्षणाची चळवळ उभारण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला. लहुजी आणि जोतीराव यांचे नाते केवळ तात्कालिक व्यायाम गुरु आणि शिष्य म्हणून नव्हते; तर लहुजींचे जोतीरावांवर पुत्रवत प्रेम होते. आणि जोतीरावही लहुजींचा प्रत्येक सल्ला शिरसावंद्य मानत असत. अंमलात आणत असत. इ. स. १८४१ ते १८४७ पर्यंत जोतीराव आपल्या गुरुजींच्या तालमीत सातत्याने जात असत. स्त्री शूद्रातिशूद्रांसाठी, अस्पृश्यांच्या मुलींसाठी शाळा सुरू करण्याच्या जोतीराव फुले यांच्या क्रांतिकारी निर्णयामागे लहुजी बाबा साळवे यांचा भक्कम पाठिंबा होता. ही शाळा स्थापन करण्यापूर्वी पुण्यात जोतीरावांनी जी पहिली जाहीर सभा घेतली, त्या सभेचे अध्यक्षस्थान त्यांनी आपले गुरु लहुजी बाबा साळवे यांना दिले होते. सत्यशोधक विचारवंत फुलवंताबाई झोडगे लिहितात-

"विद्यार्थीदशेतच जोतिबाचा मित्र गोतावळा बराच वाढला होता. गोवंडे, जोशी इत्यादी मित्रांबरोबर तो आपल्या पुढील कार्यासंबंधी बोलत असे व त्यांचा सल्ला घेत असे. वस्ताद लहुजी मांग, खंडू रामोशी हे तर जोतिबाला देव माणूस समजत असत. मात्र असे असले तरी जोतिबा फुले त्यांना शारीरिक खेळाचे गुरु मानीत होते. तारीख २५ डिसेंबर १८४७ रोजी फुले वाड्याच्या समोर असलेल्या मैदानात झालेली जंगी सभा पुण्यातच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रात दुमदुमून राहिली. या सभेचे अध्यक्षस्थान लहुजी मांग यांनी भुषविले होते; तर प्रमुख वक्ते जोतीराव फुले हे होते."

(झोडगे फुलवंताबाई, ' सावित्रीबाई फुलेः काल आणि कर्तृत्व', पृष्ठ क्रमांक- ५५)

गुरुवर्य लहुजी साळवे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेनंतर लगेचच जोतीरावांनी पुण्यात भिडे यांच्या वाड्यामध्ये १४ जानेवारी १८४८ रोजी अस्पृश्य आणि शूद्रातिशूद्रांसह सर्व जाती धर्माच्या मुलींसाठी भारतातील पहिली शाळा काढली. या शाळेत शिक्षिका म्हणून सावित्रीबाई फुले आणि फातिमा बीबी शेख यांची नियुक्ती केली. अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी महात्मा फुले यांनी जी शिक्षण मंडळी स्थापन केली, तिचे नाव ' महार मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरिता मंडळी' असे होते. या संस्थेचे अध्यक्ष सदाशिव बल्लाळ गोवंडे तर सचिव मोरो विठ्ठल वाळवेकर असून, जोतीराव फुले हे फक्त सभासद होते. ( 'म. फुले समग्र वाङ्मय' , पृष्ठ क्रमांक- ६१२ ) त्या काळातील जोतीराव फुले किंवा लहुजी साळवे ही माणसं नावासाठी काम करत नव्हती; तर कामासाठी काम करत होती हे लक्षात येते. म्हणूनच कागदपत्रांमध्ये लहुजींचे उल्लेख फारच तुरळक ठिकाणी सापडतात. अस्पृश्यांना शिक्षण देण्याच्या कामी आणि एकंदरीतच मुलींच्या शिक्षणासाठी तसेच महात्मा फुले यांच्या प्रत्येक सामाजिक कार्यामध्ये लहुजी साळवे यांचा हिरीरीने सहभाग होता. आपल्या तालमीत तयार झालेले अनेक बहाद्दर पठ्ठे जोतीराव आणि सावित्रीमाईच्या संरक्षणासाठी लहुजींनी नेमलेले होते. सावित्रीबाईंना मिसेस फरारा मॅडम यांच्याकडे शिक्षक प्रशिक्षणासाठी अहमदनगर येथे घेऊन जाण्यासाठीही लहुजींनी मदत केली होती. पुण्यासारख्या सनातन्यांच्या राजधानीत अस्पृश्य आणि बहुजनांच्या मुलींसाठी शाळा स्थापन करणे, सावित्रीबाईंना शाळेत जाण्यासाठी संरक्षण देणे आणि या शाळांसाठी मुली गोळा करणे या कामी लहुजींनी दिलेले योगदान लक्षणीय होते. या संदर्भात स्वतः महात्मा फुले म्हणतात , " अतिशुद्रांस शिकविण्यामुळे आमच्या जातवाल्यांस फार वाईट वाटले व प्रत्यक्ष माझ्या बापाने देखील मला घरांतून घालविले. तेव्हा निरुपायी होऊन आपल्या रक्षणाबद्दल काही काम केले पाहिजे असे प्राप्त झाले. आणि शाळाही बंद पडली. कारण कोणी जागा देईना व बांधावयास रुपये नव्हते व लोक आपली मुले पाठवावयास इच्छिनात. परंतु त्यावेळेस लहुजी बिन राघू राऊत मांग व रानबा महार यांनी शिकण्यापासून कसे लाभ आहेत, हे आपल्या जातवाल्यांस समजावून त्यांची खात्री केली व सदाशिव बल्लाळ गोवंडे यांनी शाळेसाठी जागा देऊन काही पाट्या दिल्या व दर महिन्याला दोन रुपये देऊ लागले. त्यामुळे ती शाळा पुन्हा बरीच चालू लागली आणि मुले फार जमली. ( 'म. फुले समग्र वाङ्मय', पृष्ठ क्रमांक - ६११)

सत्यशोधक लहुजी साळवे आणि महात्मा फुले यांच्या संबंधाबाबत प्रसिद्ध विचारवंत गं. बा. सरदार लिहितात - , " शिवछत्रपती आणि जॉर्ज वॉशिंग्टन यांची चरित्रे वाचून जोतिबांच्या अंतःकरणात देशाभिमानाची भावना जागृत झाली होती. म्हणून त्यांनी वस्ताद लहुजी मांग यांच्या हाताखाली दांडपट्टा आणि गोळी निशाण मारण्याची विद्या शिकण्यास प्रारंभ केला ." ( सरदार, पृष्ठ क्रमांक - ५) जोतिबांच्या मनात मांग महारांविषयी कळवळा उत्पन्न होण्याचे अजून एक कारण म्हणजे त्यांची मावस बहीण सगुणाबाई. जोतीरावांनी मांग महार यांची सेवा करावी आणि फादर सारखे नाव कमवावे अशी त्यांची धारणा होती. आपले गुरू लहुजी साळवे यांच्या बद्दलचा आदर प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केला आहे. लहुजी साळवे यांची पुतणी मुक्ता साळवे हिला सावित्रीबाई आणि जोतीराव या दोघांनीही मन लावून शिकविले. तिने लिहिलेल्या 'मांग महारांच्या दुःखाच्या निबंधाची' दोघांनीही तारीफ केली. त्यांच्या शाळेला भेटी देणाऱ्या प्रत्येकाला हे दोघेही मुक्ताचा निबंध मोठ्या प्रेमाने दाखवत असत. अशा प्रकारच्या कृतींतून त्यांनी आपल्या गुरू बद्दलचा आदर भावना व्यक्त केलेला दिसून येतो. लहुजी साळवे यांचे धाकटे भाऊ गणू बिन राघोजी यांना शिक्षक म्हणून महात्मा फुले यांनी आपल्या शाळेमध्ये नेमणूक दिल्याचाही संदर्भ मिळतो. ( 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', पृष्ठ क्रमांक - ६४०) शिवाय मुक्ता साळवे या विद्यार्थिनी बरोबरच धोंडी बिन हनुमंत मांग , विठू बिन पांडूजी मांग ( शाळा क्रमांक-१) , कोंडी बिन कल्लू मांग , महादू बिन कानू मांग, नामा बिन लिंबा मांग ( शाळा क्रमांक-३) इत्यादी विद्यार्थी हे महात्मा फुले यांच्या शाळेतील हुशार विद्यार्थी म्हणून गणले जात होते. ( ' म.फुले समग्र वाङ्मय', पृष्ठ क्रमांक - ६५१) तसेच गुरू लहुजी साळवे यांच्या नात्यातील गणू शिवाजी मांग हे ही महात्मा फुले यांच्या शाळेतील एक हुशार अभ्यासू शिक्षक म्हणून कार्यरत होते. (' म. फुले समग्र वाङ्मय', पृष्ठ क्रमांक -६५६) लहुजी साळवे यांनी जोतीरावांच्या भेटीनंतर पूर्णपणे सत्यशोधक जीवनपद्धती अंगीकारली. आपल्या सर्व शिष्यांना आणि नातेवाईकांना त्यांनी सत्यशोधक पद्धतीने जगण्याचा मार्ग दाखविला. लहुजींचे शिष्य म्हणून बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके आदींना बळोबळी उभे करण्यात येत असले तरी खऱ्या अर्थाने महात्मा जोतीराव फुले हेच लहुजी साळवे यांचे खरे अनुयायी, खरे शिष्य ठरतात, हेच पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. अशाप्रकारे व्यायामाचे गुरु ते जीवनातील मार्गदर्शक आणि संरक्षक म्हणून शेवटपर्यंत सत्यशोधक लहुजी साळवे यांनी महात्मा फुले यांना शैक्षणिक, सामाजिक कार्यामध्ये भरीव साथ दिलेली आहे. महात्मा फुले यांच्या निर्वाणा आधी नऊ वर्षे अगोदर लहुजी साळवे यांचे पुणे येथे १८८१ साली निधन झाले. पुण्यातील फुले वाड्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर उभी असलेली लहुजी साळवे यांची तालीम आजही या गुरु-शिष्यांच्या नात्याची प्रचिती देत उभी आहे.

# कधी येणार अक्कल ?



यशवंत कण्हेरे
संपर्क क्र. 9767846070

आधुनिक केसरी

**प्रेम करताना एक लाख वेळा सजगपणे विचार करायला हवाच, की आपलं प्रेम आंधळ नाही ना, डोळ्याला जे दिसतंय तेच सत्य आहे की घरातली मोठी माणसं सांगतायत ते सत्य आहे एकदा नक्की विचार करायला हवा. या अमानवी कृत्याचा या ठिकाणीजगाच्या पातळीवर जाहीर निषेध करतो.**

हिंदू धर्म हा आता विशाल समुद्र सारखा असून तो जगातील सर्वश्रेष्ठ संस्कृतीने भरलेला आहे. हिंदू धर्मात स्त्रीला अनन्यसाधारण असं महत्त्व आहे. हिंदू धर्मात स्त्रीला देवी देवता मानून त्यांची पूजा करण्याची एक संस्कृती आहे. हिंदू धर्मात लग्न हे अतिशय पवित्र बंधन आहे. लग्न आधी शरीर संबंध हे हिन्दुधर्मात अपवित्र मानले जाते. हिंदू धर्मात प्रेम एक पवित्र साधना आहे. त्या प्रेमाच्या साधनेने स्त्री आणि पुरुषाचे जीवन आनंदी आणि प्रकाशमान होते. हिंदू धर्माच्या संस्कृती बाबतीत अनेक संतजन अनेक विविध पंथातील विचारवंत जसे कीर्तनकार प्रवचनकार धर्माचा महिमा सांगत असतात. हिंदू धर्म रक्षक छत्रपती शिवाजी महाराज, हिंदू धर्म रक्षक राणा प्रताप सारख्या अनेक राजांनी आपल्या परक्रमाची शिकस्त केलेली आहे. स्वामी विवेकानंदांचा इतिहास आत्मसात केल्यावर हिन्दुधर्म युवक युवतींना अतिशय चांगली प्रेरणा मिळते. भगिनींनो जरा विचार करा आपल्या या अशा वागण्याने आपल्या मातापित्यांवर धर्मातील तरुणांवर अतिशय वाईट परिणाम होतात. माझ्या प्रत्येक हिंदू धर्मातील भगिनींना माझी नम्र विनंती की, माझी ताई हिंदू धर्म स्त्री वर कुठलेही बंधने लादली जात नाही. पण ती या धर्माच्या संस्कृतीचा पाया आहे. आणि म्हणून स्त्रीने संस्कृती जोपासलीच हे बंधन नसून माता भगिनिंचे परम कर्तव्य आहे. अत्याचार हा स्त्रीवरच होत असतो.

प्रेमाची व्याख्या बदलत चाललीय, मुंबईची श्रध्दा मदन, आफताब पूनावालाच्या प्रेमात बुडून, घरदार आईवडील सोडून लिव्ह इनमध्ये राहायला गेली आणि लग्नासाठी मागे लागते म्हणून



आफताबने तिला मारून, ३५ तुकडे करून ते ३०० लिटरच्या नवीन फ्रीजमध्ये साठवून पुढचे १६ दिवस रोज एक एक तुकडा जवळपासच्याच जंगलात नेऊन टाकला. ह्या विचाराने की प्राण्यांनी खाल्ल्यावर कुणाला जे झालंय ते कळणार नाही. आई-वडिलांनी खूप सांगूनसुध्दा न ऐकल्याचा इतका भयंकर परिणाम असू शकतो हे श्रध्दाला कदाचित शेवटच्या क्षणापर्यंत कळलं ही नसेल.

प्रेम करताना एक लाख वेळा सजगपणे विचार करायला हवाच, की आपलं प्रेम आंधळ नाही ना, डोळ्याला जे दिसतंय तेच सत्य आहे की घरातली मोठी माणसं सांगतायत ते सत्य आहे. एकदा नक्की विचार करायला हवा. या अमानवी कृत्याचा या ठिकाणीजगाच्या पातळीवर जाहीर निषेध करतो.

# स्वप्रतिमाप्रेम (नार्सिसिझम ते सेल्फीझम)

आधुनिक केसरी

**आजचे युग हे स्वप्रतिमाप्रेमी लोकांचे युग आहे. आजचा माणुस हा नार्सिसस (Narcissus) झाला आहे. कोण बरे होता हा नार्सिसस? एका ग्रीक दंतकथेनुसार तो ग्रीकमधल्या थेस्पीई इथला शिकारी होता. नदीदेवता सेफीसस आणि लिरीओप नावाची परी हे त्याचे मातापिता होते. हा नार्सिसस त्याच्या रूपवान असण्यासाठी प्रसिद्ध होता जणूकाही मदनाचा पुतळाच! असा हा नार्सिसस स्वतःच्याच सौंदर्याच्या अतिप्रेमात पडला होता. शिकारीला गेलेला असतांना त्याने एकदा सहजच पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब पाहिले आणि तो स्वतःच्या प्रतिमेच्या इतका प्रेमात पडला की त्याने त्याच्याकडे प्रेमाची याचना करणारे सर्व प्रस्ताव धुडकावून लावले! तेव्हापासुन त्याची स्वतःच्या रूपावरून नजरच हटेनासी झाली, अहो आश्चर्य म्हणजे स्वतःच्या प्रतिमेला न्याहाळत त्याने उर्वरित आयुष्य व्यतीत केले. त्यावरूनच नंतर "नार्सिसस" म्हणजे "स्वप्रतिमाप्रेमी" हा शब्द रूढ झाला. ज्याचा सरळ अर्थ होतो की स्वतःपेक्षा श्रेष्ठ कोणीच नाही ही मानसिकता, किंबहुना विकृत मानसिकता... अशा मानसिकतेची व्यक्ती स्वतःच्या गरजा, इच्छा, आकांक्षा यांचीच कदर करते, स्वतःची काळजी घेते, स्वतःचे स्वार्थ जपते आणि स्वतःचीच प्रशंसा ऐकण्यात रममाण होते. पुढे चालून वैज्ञानिक भाषेत यालाच 'नार्सिसिस्टीक पर्सनॅलिटी डिसऑर्डर' म्हणून ओळखले जाऊ लागले**

आजच्या समाजमाध्यम युगातला माणुस इतका 'स्वप्रतिमाप्रेमी' अर्थात 'सेल्फीस्टिक' (SELFISTIC) झाला आहे की तो सतत प्रत्येक ठिकाणी जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी केवळ स्वतःची प्रतिमाच न्याहाळण्यात परमसुखाची अनुभूती घेत असतो. या भ्रमणध्वनीमुळे (मोबाईल) तर मनुष्य प्राण्याच्या 'नार्सिसस' असण्यावर जणू अनायासे शिक्कामोर्तब झाले आहे. आजच्या घडीला त्यासाठी साजेसी 'सेल्फीझम' ही संकल्पना चपखल बसते! समाजात आज या प्रवृत्तीने प्रचंड जोर धरला आहे. म्हणजे झाले आहे असे की या अत्याधुनिक (स्मार्ट) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने स्वतःच्या हव्या तेवढ्या चकचकीत प्रतिमा तयार करण्यात मनुष्यप्राणी तरबेज झाला आहे. समाजमाध्यमांमध्ये ( DP, STATUS, PROFILE) इत्यादी ठिकाणी स्वतःच्या चकचकीत घासून गुळगुळीत केलेल्या पन्नाशीकडे झुकूनही पंचविशीत भासणाऱ्या म्हणजे वयाचा फरक अर्ध्याने कमी करणार्याघ उच्चप्रतीच्या डिजिटल (DIGITAL) आणि मेणाहून मऊ (ULTRA SOFT) प्रतिमा रोज स्वतःच असंख्य वेळा काढत आणि न्याहाळत माणुस आज वेळ घालवू लागला आहे. दिवसाला कितीतरी स्वप्रतिमा (SELFIE) काढत माणुस पुरता स्वप्रतिमाप्रेमी बनत चालला आहे याचे प्रत्यंतर सतत येत असते. क्वचितप्रसंगी एखाद दुसरी स्वप्रतिमा (SELFIE) ठीक असते, पण आजमितीस तर उठता बसता प्रत्येक मिनिटाला या स्वप्रतिमा (SELFIE) काढणे बिनदिक्कत सुरु असते! तर हा झाला स्वप्रतिमाप्रेमी म्हणजे नार्सिसस असण्याचा सरळ सरळ अर्थ!

"स्वप्रतिमाप्रेमी" या मूळ संकल्पनेवर आधारित या शब्दाचा रूपकात्मक अर्थ अधिक महत्वाचा आहे जो माणसाच्या आजच्या वागण्याचा गाभा आहे. आज, प्रत्येक व्यक्तीने त्याची किंवा तिची विशिष्ट अशी एक प्रतिमा निर्माण करून ठेवली आहे. त्या व्यक्तीच्या वागण्यामुळे कळत - नकळत ही प्रतिमा निर्माण होऊन जाते आणि नंतर "नार्सिसस" प्रमाणे अख्खे आयुष्य ती व्यक्तीच ती प्रतिमा जपण्यासाठी अंतर्मुग्ध होऊन धडपड करत बसते. ही धडपड इतकी बेमालूमपणे त्या व्यक्तीच्या अंगवळणी पडते की, नंतर ती व्यक्ती त्या प्रतिमेच्या बाहेर पडायला तयारच होत नाही.

'कडक' स्वभाव असणे ही तशी एकदम चमत्कारीक प्रतिमा आहे. एखाद्याला "मी खुप कडक आहे" असे दाखवण्यात स्वारस्य असते. त्या व्यक्तीला वाटते की तिची ही कडक असण्याची प्रतिमाच लोकांच्या मनात कायम राहावी आणि त्या व्यक्तीला कुणीही क्षणभर देखील त्याव्यतिरिक्त समजूच नये. थोडक्यात काय तर त्या व्यक्तीला सगळे दबकून असले पाहिजे असा त्या



व्यक्तीचा अट्टाहास असतो.

'कणखर' ही या वर नमुद केलेल्या 'कडक' पेक्षा पुर्णतः वेगळी प्रतिमा आहे. खरीखुरी कणखर व्यक्ती ही कमालीची लवचिक असते आणि ती 'कडक' च्या पूर्णतः विपरीत असते. खरीखुरी कणखर व्यक्ती ही अतिशय दमदार असते आणि ती कधीही कुणाला त्रास देत नाही आणि कुणाचे यत्किंचितही नुकसान करत नाही. अशा कणखर व्यक्तीला स्वप्रतिमेची अजिबात काळजी नसते!

"मेणाहुन मऊ" अशी स्वप्रतिमा निर्माण करणारा एक वर्ग असतो, आणि अशी व्यक्ती आपल्या या प्रतिमेला जिवापाड जपत असते. या मऊ व्यक्तीच्या प्रतिमेचा गैरफायदा घेणारा एक बराच मोठा वर्ग असतो म्हणून अशा मऊ असणाऱ्या व्यक्तीने स्वप्रतिमा जपण्याबरोबरच लोकांकडून फसवले जाण्याची तयारी ठेवावी.

'सुहास्यवदनी' अशी हवीहवीशी वाटणारी प्रतिमा जपणारा एक मोठाच वर्ग असतो. ही प्रतिमा तशी आसेतुहिमाचल सगळ्यांनाच भावणारी असते. आभाळाएवढे संकट कोसळले तरीही या व्यक्तींच्या सुहास्यवदनावर विपरीत परिणाम होत नाही. या व्यक्ती स्वतःच्या लाघवी वागण्यातून स्वतःची अवीट अशी प्रतिमा निर्माण करण्यात यशस्वी होतात आणि ती टिकवतात सुद्धा!

जशा हव्याहव्याशा वाटणाऱ्या काही स्वप्रतिमा असतात तशाच काही स्वप्रतिमा नकोशा वाटणाऱ्या सुद्धा असतात. यामध्ये प्रामुख्याने एक असते ती म्हणजे 'निराशावादी'. काही लोकांच्या चेहऱ्यावर इतके प्रचंड निराशावादी भाव असतात, जणू काही जगातील सर्व संकटे याच लोकांच्या वाट्याला आलेली आहेत आणि यांना दुसरीकडे कुठेही थाराच नाही.

डॉ. संगीता जी. आवचार
संपर्क क्र. : 9767323290

विशेष म्हणजे अशी व्यक्ती स्वतःच्या 'निराशावादी' या प्रतिमेच्या इतकी प्रेमात पडलेली असते की तुम्ही तिच्यासमोर कितीही करमणूक सादर करा, या व्यक्तीच्या चेहऱ्यावरचे भाव कधीही बदलणार नाहीत. संसर्ग झाल्याप्रमाणे बरेचदा जर आपण या लोकांच्या संपर्कात गेलो तर हा निराशावाद आपल्याला देखील ग्रासण्याची शक्यता असते, म्हणून अशा व्यक्तीपासून थोडेसे सुरक्षित अंतर ठेवूनच असायला हवे.

स्वप्रतिमाप्रेमी व्यक्तींमधे एक अशीच विचित्र प्रतिमा घेऊन जगणारे काही जण असतात. या प्रतिमेच्या व्यक्तीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य असे की तिला वाटते की, आपण म्हणजे या जगाचे सर्वेसर्वा आहोत आणि आपल्याशिवाय जगाचे पानही हलत नाही आणि इतर कुणाला काही समजतही नाही. अशी व्यक्ती स्वतःला या जगाची तारणहार समजते. या व्यक्तीची अशी ईच्छा असते की लोकांनी सतत या व्यक्तीच्या उपकाराच्या ओझ्याखाली दबुनच राहावे आणि लोकांनी सतत त्या व्यक्तीबद्दलच बोलत राहावे. जगामध्ये उलथापालथ करण्याचे सामर्थ्य फक्त आपल्यातच आहे या अविर्भावातुन या व्यक्ती आजन्म बाहेर पडू शकत नाहीत. अशा व्यक्ती याच प्रतिमेत जगतात आणि मरतात सुद्धा, पण यांच्या प्रतिमेमुळे सुज्ञ आणि सरळ लोकांच्या भावनेला गेलेले तडे मात्र जीवनभर तसेच राहतात.

सगळ्यात हवीहवीशी वाटणारी माणसाची माणुस म्हणून असलेली प्रतिमा जी महान लोक आपले कर्तव्य आणि बोलण्यावागण्यातून नकळत जपत असतात. स्वप्रतिमा निर्मितीसाठी त्यांना कोणतेही प्रयत्न करण्याची कधीच गरज वाटत नाही. अशा व्यक्तींच्या प्रेमळ सहवासाने आपले आयुष्य देखील सुगंधित होऊन जाते. अर्थात "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले" अशी ही महान माणसे असतात. या लोकांचा निगर्वीपणा तर इतका असतो की साक्षात हिऱ्यांची खाण गवसली तरी देखील यांचे तेज त्या हिऱ्यांच्या खाणीतील एकत्रित तेजापेक्षा कणभर सरसच ठरावे! अशा व्यक्तींच्या निर्मोही प्रतिमेवर तर आज जग जिवंत आहे! स्वतःचा विचार त्यागून मानव जातीच्या उद्धारासाठी झटणारे असे अनेक महान लोक कधीही कोणत्याही प्रतिमेच्या बंधनात अडकले नाहीत! "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" एवढीच काय ती या कर्तव्य परायण लोकांची अनुभुती मानवी मनावर बिंबली जाते ती कायम! असे अनेक महान लोक आहेत ज्यांनी स्वतःच्या प्रतिमेची चिंता कधीच केली नाही. तरी सुद्धा या व्यक्तींच्या प्रतिमा आपल्या मनःपटलावर कायम कोरल्या गेल्या आहेत. अशा सर्व प्रतिमांना आणि त्या व्यक्तींना मनाच्या गाभाऱ्यात विराजमान केले की आयुष्याचे सार्थक होते आणि माणसाला स्वप्रतिमाप्रेमात बुडण्याचे कसलेही भय राहत नाही. स्वप्रतिमाप्रेम सकारात्मकरित्या जपले तर ते डिसऑर्डर (DISORDER) मध्ये रूपांतरित होत नाही... अर्थातच कुठल्याही प्रतिमेच्या मागे लागण्याची सूतराम निकड भासत नाही कारण 'प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट' हे तसेही आभासी सत्य आहे!

**(लेखिका कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी येथे उपप्राचार्य व इंग्रजी विभागप्रमुख आहेत.)**

# राज्यासाठी मंजूर झालेले उद्योग इतर राज्यात जाणे चिंताजनक



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात प्रस्थापित होणारे कोणतेही प्रकल्प किंवा उद्योग असो इतर राज्यात जाऊ नये याची जबाबदारी सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्षांची असते म्हजेच संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांची(लोकप्रतिनिधींची) असते.कोणताही प्रकल्प आला नाही याची खंत महाराष्ट्रील जनतेला अवश्य वाटेल यात दुमत नाही.परंतु महाराष्ट्र आलेले प्रकल्प काही महीण्यातच इतर राज्यात पळवून नेणे किंवा घेऊन जाणे व राज्यातील राजकीय पुढारी डोळ्यावर पट्टी बांधून पहात रहाणे यांचे दुःख अवश्य महाराष्ट्रातील जनतेला जाणवते हि बाब राजकीय दृष्ट्या बरोबर नाही असे मला वाटते. यामुळे महाराष्ट्रातील जनतेच्या भावना दुखावल्याचे दिसून येते.**

कारण कोणताही प्रोजेक्ट बनतो त्यावेळेस त्याची संपूर्ण शहानिशा अगोदरच केली जाते तेव्हाच प्रोजेक्टला मंजूरी मिळते. याकरिता अगोदर त्या परिसरातील जमिनीचा आढावा, शहराचा आढावा, दळणवळणाची साधने, पाण्याची सोय, वाहतुकीची सुविधा, उद्योगांसाठी लागणारा रोजगार याचा मुख्यत्वे करून विचार करूनच पुढचे पाऊल उद्योजक उचलत असतात. तेव्हाच कोणत्याही प्रकल्पाला किंवा उद्योगाला सरकारकडून मंजुरी मिळते.परंतु गेल्या काही महिन्यांपासून प्रकल्प पळवापळवीचे राजकारण सुरू असल्याचे दिसून येते व राजकीय पुढारी फक्त तमाशा पहाण्याचे काम करीत असल्याचे सुध्दा दिसून येते.राज्यातील प्रकल्प इतर राज्यात जाण्याचे कारण सत्ताधारी सरकार जुन्या सरकारवर टाकतात तर जुने सरकार सत्ताधाऱ्यांवर ताशेरे ओढतात.यामुळे राजकीय पुढाऱ्यांना राजकारण करण्यासाठी मोठा मसाला मिळतो व मिडिया समोर येवून एकामेकावर टीकाटिप्पणी करतात व आपले राजकारण साध्य करण्याचा प्रयत्न करतात. ही बाब राजकीय पुढाऱ्यांपर्यंत व राजकारणापर्यंत ठीक आहे. परंतु राजकीय पुढाऱ्यांच्या राजकारणात सर्वसामान्य भरडल्या जातो व बळी पडतो त्याचे काय?

महाराष्ट्रातील प्रकल्प इतर राज्यात जाणे म्हणजेच वाढत्या बेरोजगारीला प्रोत्साहन देणे व बेरोजगारी वाढवीणेच म्हणावे लागेल.कारण गेल्या तीन महिन्यांच्या दरम्यान महाराष्ट्रातील 4 प्रोजेक्ट (उद्योग)इतर राज्यात निघून गेले.या प्रोजेक्टची किंमत कमीत कमी 1लाख 90 हजार करोड रूपये असल्याचे सांगितले जाते.या प्रोजेक्टमुळे राज्याच्या 1 लाख 50 हजार बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला असता. म्हणजेच दिड लाख कुटुंबांना दिलासा मिळाला असता. त्यामुळे आलेले प्रोजेक्ट गेल्याने बेरोजगार युवक हताश झाल्याचे दिसून येते.वेदांत-फॉक्सकॉनचा प्रोजेक्ट 1.54 लाख करोड रुपयांचा प्रोजेक्ट पुणे येथे होणार होता तो आता अहमदाबादला गेला,टाटा-एयरबसचा प्रोजेक्ट 22 हजार करोड रुपयांचा होता तो नागपूर येथे येणार होता तो आता वडोदरा येथे गेला,सैफ्रेन प्रोजेक्ट10,085 करोड रुपयांचा होता तो नागपूरला येणार होता परंतु हैदराबादला गेला,बल्क ड्रग पार्क 1200 करोड रुपयांचा होता तो रायगड येणार होता परंतु उना(हिमाचल)ला गेला.ह्या सर्व घटना राज्याचे 48 खासदार व 288 आमदार उघड्या डोळ्यांनी पाहत रहाले व प्रोजेक्ट निघून गेले.परंतु राज्यात प्रस्थापित होणारे प्रोजेक्ट रोखु शकले



नाही याची महाराष्ट्रातील जनतेला अवश्य खंत व दुःख वाटत असेल ही अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे. राज्यातील 4 प्रकल्प तर गेलेच या पाठोपाठ आणखी एक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेल्याचे समोर आले आहे. ऊर्जा उपकरण निर्मिती झोन प्रकल्प मिळविण्यात मध्यप्रदेश सरकारने बाजी मारल्याचे सांगितले जाते.केंद्र सरकारने फेब्रुवारी2022 च्या अर्थसंकल्पात ऊर्जा उपकरण निर्मिती झोन प्रकल्पाची घोषणा महाराष्ट्रासाठी केली होती.हा प्रकल्प आघाडी सरकारमुळे बाहेर गेल्याचे सरकार सांगत आहे. म्हणजेच राजकारण्यांच्या राजकारणाने राज्याच्या दिड लाख बेरोजगारांच्या नौकऱ्या दुसऱ्या राज्याच्या झोळीत टाकल्या व आपली झोळी खालीच रहाली हे महाराष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल.राजकीय पुढारी म्हणतात की महाविकास आघाडीच्या चुकांमुळे महाराष्ट्रातील उद्योग हातातून गेले.ह्या गोष्टींशी सर्वसामान्यांना किंवा बेरोजगारांना काय देने-घेणे असावे.केंद्र सरकार सांगत आहे की 2027 पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर रहाणार ही स्वागतार्ह बाब आहे आणि रहायलाच पाहिजे.कारण भारताकडे सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण जग तिसरी शक्तीच्या रूपात पहात आहे ही गौरवास्पद बाब आहे.परतुं राज्यांना दिलेले प्रोजेक्ट पळवापळवी करणे थांबविले पाहिजे यात केंद्र सरकारने सुध्दा हस्तक्षेप करायला हवा.कारण यामुळे सर्वसामान्यांच्या व बेरोजगारांच्या भावना दुखावतात आणि यांचा विपरीत परिणाम समाजात आपल्याला पहायला मिळतो.त्यामुळे महाराष्ट्र येणारे कोणतेही प्रोजेक्ट किंवा उद्योग असो ते पुन्हा पळवापळवीचे केंद्र बनणार नाही याची जबाबदारी संपुर्ण राजकीय पुढाऱ्यांनी, महाराष्ट्र सरकारने व केंद्र सरकारने घ्यावी व महाराष्ट्राचा आणि महाराष्ट्रातील जनतेच्या भावना दुखावणार नाही याची जातीने काळजी घेतली पाहिजे.त्याचप्रमाणे महाराष्ट्र सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी सर्वांनीच तत्परता दाखवावी यातच खरा राज्याचा विकास दिसून येईल.जय हिंद!

# ८ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले

## शेवगाव येथील भूमी अभिलेख कार्यालयामध्ये लाचलुचपत विभागाने टाकला छापा

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** येथील भूमी अभिलेख कार्यालयामध्ये लाचलुचपत विभागाच्या पथकाने टाकलेल्या छाप्यात शेवगाव येथील भूमी अभिलेख कार्यालयाचा कर्मचारी प्रदीप शंकर महाशिकारे (वय ४६) पद भू करमापक वर्ग ३ भूमी अभिलेख शेवगाव हा कर्मचारी या पथकाने ८ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडला.

तक्रारदार यांचे आजोबा यांचे नावे अमरापूर ता.शेवगाव शिवारातील शेत गट नं १८० मध्ये असलेल्या २१ गुंठे जमिनीची भूमी अभिलेख कार्यालाकडून मोजणी करून घेतली होती. मोजणीनुसार खातेदार यांचे पोट हिस्से करून हद्दीच्या खुणा दर्शविण्यात आल्या होत्या. त्याचा सुधारित नकाशा देण्याकरीता त्यातील आरोपी लोकसेवक हे रुपये १० हजार रुपयांची मागणी करत असल्याची तक्रार लाचलुचपत विभागास प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने सोमवार दि.१४ लाचलुचपत अधिकारी यांच्या टाकलेल्या छाप्यात तडजोडी अंती ८ हजार रुपये स्वीकारल्याचे मान्य केले. त्यावरून आज दि.१४ नोव्हेंबर रोजी शेवगाव ताजनापूर रोडवरील स्मशान भूमीजवळ हा लाचेचा सापळा लावण्यात आला. त्यातील आरोपी लोकसेवकाने ८ हजार रुपये पंचासमक्ष स्वीकारले व आरोपीस रंगेहात पकडण्यात आले. या बाबत शेवगाव पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सुनील कडासने सो.पोलीस अधीक्षक ला.प्र.वी. नाशिक परिक्षेत्र नाशिक, नारायण न्याहळदे सो.अपर पोलीस अधीक्षक नाशिक, अहमदनगर जिल्ह्याचे लाचलुचपत विभागाचे पोलीस उपअधीक्षक हरीश खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, सापळा निरीक्षक अधिकारी गहिनीनाथ गमे, ला.प्र.वि. अहमदनगर, सापळा अधिकारी शरद गोर्डे, पोलीस निरीक्षक ला.प्र.वी.अहमदनगर पोलीस हवालदार संतोष शिंदे, पोलीस नाईक रमेश चौधरी, विजय गुंगर, पोलीस अंमलदार वैभव पांढरे, रवींद्र निमसे, सचिन सुद्रक, आसाराम बटुळे, चालक पो.ह. हरून शेख यांच्या पथकाने ही कारवाई केली.





# अमरकुमार तायडे यांना पीएच.डी.

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**मलकापूर :** सध्याची युवापिढी सोशल मीडियामध्ये गुरफटली आहे. अशी ओरड आहे. मात्र याला फाटा देत मलकापूरातील एका तरुणाने उत्तुंग भरारी घेतली आहे. गोपाल कृष्ण नगर मधील अमरकुमार आनंद तायडे ह्या तरुणाने अमेरिकेतील नामांकित साऊथ वेस्टन युनिव्हर्सिटी मधून समाजशात्र मध्ये पीएच. डी मिळवली आहे. अमरने आपल्या बुद्धीच्या जोरावर कमी कालावधी मध्ये अमेरिकेसारख्य नामांकित युनिव्हर्सिटीमधून डॉक्टरेट घेऊन एक रिकोड बनवला आणि आपले नाव सुवण अक्षरात कोरले. या तरुणाचे हे यश निश्चितच अभिमानास्पद आहे. मलकापूर सारख्या भागात राहून अमरने हे यश मिळवून सर्वांसमोर आदर्श निर्माण केला आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण अमरावती विद्यापीठामधून तर इतर पदवीचे शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पूर्ण झाले आहे. जिद्द व चिकाटीच्या जोरावर यशाला गवसणी घालता येते हे त्याने दाखवूनच नव्हे तर सिध्द करून दाखविले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणास्थान मानले त्यांचा प्रेरणेमुळे अमरने उंच ध्येय गाठले. यासाठी त्याचा ताईने व मावशीने त्याला सातत्याने प्रोत्साहन दिले. ११ नोव्हेंबर २०२२ रोजी अमेरिकेतील साऊथ वेस्टन युनिव्हर्सिटीच्या झालेल्या दीक्षांत समारंभात प्रा. डॉ. जॉन पीटर , डॉ लियाकत अली खान, डॉ.वेद प्रकस आयती, डॉ. मिलींद दहीवले, प्रा. आर. के. शंकरनायर, डॉ. अशोक बालसुम्बण्यम यांचा उपस्थिती मध्ये अमरला डॉक्टर ऑफ फिलॉसॉफय या उपाधीने सन्मानित केले. त्याचा अगणित यशा बद्दल देशातूनच नवे तर विदेशातूनहि त्याचे कौतुक होत आहे .

# रिपाइंचा विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून अनोखा बालदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जळगाव जामोद येथील वाडी खुर्द येथे दिनांक 14 नोव्हेंबर रोजी बाल दिनाचे औचित्य साधून रिपाईच्या वतीने शिक्षणापासून कोसो दूर असलेल्या परंतु सद्यस्थितीत शिक्षण प्रवाह उच्चणाऱ्या पारधी जमातीच्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवा म्हणून रिपाईचे जिल्हाध्यक्ष प्रशांत तायडे यांनी नाविन्यपुर्ण उपक्रम वाडी खुर्द येथील पारधी तांड्या वरील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य ज्ञानवर्धक साहित्य यासह गुलाब पुष्प व खाऊचे वितरण करून या पारधी तांड्यावरील विद्यार्थ्यांसोबत बालदिन साजरा केला. यावेळी रिपाईचे जिल्हाध्यक्ष प्रशांत तायडे यांनी पारधी तांड्यावरील शिक्षणापासून वंचित असणारे विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात कसे येतील यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी बोलताना सांगितले. यावेळी बाल दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना रिपाई चे बुलढाणा जिल्हाध्यक्ष प्रशांत तायडे यांच्यासह भास्कर भटकर, अजाबराव आगरकर अरुण शिरसाठ,रोहित हेलोडे, सतीश तायडे, यांच्यासह पारधी तांड्यावरील विद्यार्थ्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जामोद गावातील समस्या त्वरित सोडवा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जळगाव तालुक्यातील जामोद गावातील विविध समस्या त्वरीत सोडवाव्यात अन्यथा आमरण उपोषण करु असा इशारा जामोद येथील ग्रामपंचायत सदस्य पती गौतम गवई यांनी दि 9 नोव्हेंबर रोजी गटविकास अधिकारी पं. सं जळगाव जा. यांना दिलेल्या निवेदनातून केला आहे.

सदर निवेदनात नमूद आहे की, तालुक्यातील सर्वात मोठी असलेली आदिवासीबहुल ग्रामपंचायत जामोद येथे स्थानिक बोरवेलचे क्षारयुक्त पाणी ग्रामस्थांना प्यावे लागते. तरीसुद्धा ग्रामपंचायत कडून बेसुमार पाणी कर वसूल केला जातो. गावामध्ये लाखो रुपये खर्च करून हायमास्ट लाईट लावले. पोलवरील लाईट हे कित्येक दिवसापासून गेले असले तरी ग्रामपंचायत ती बसवत नाही.

गावामध्ये अंधाराचे साम्राज्य आहे ग्रामपंचायतीने काही दिवसांपूर्वी लावलेले इलेक्ट्रिक पोल वर लाईट सुद्धा सुरू नाहीत गावात घाणीचे साम्राज्य पसरले असून नालीसफाई न करता सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांनी त्याचे बिले काढून भ्रष्टाचार व गैरप्रकार करीत



आहेत . गावातील नुकतेच तयार केलेले ढापे हे मोडकडीत आले आहेत, गावातील रस्त्याची कामे, ढापेची कामे ही निकृष्ट दर्जाची झालेली आहेत. या सर्व भ्रष्टाचार व गैरप्रकाराची तात्काळ चौकशी करावी अन्यथा लोकशाही मार्गाने २१ नोव्हेंबर रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा मागासवर्गीय ग्रामपंचायत सदस्य पती गौतम संतोष गवई यांनी गटविकास अधिकाऱ्यांसह मुख्य कार्यपालन अधिकारी आणि ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांना दिला आहे.

# परिश्रम, चिकाटी व सातत्य यशाची त्रिसूत्री : उपासे

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर अपयशाला घाबरता कामा नये, जो माणूस प्रयत्नशील असतो त्याच माणसाकडून चुका घडतात,अपयश येते. मात्र या अपयशाला न घाबरतात घडलेल्या चुका मध्ये सुधारणा करून परिश्रम, चिकाटी व सातत्याने ध्येयप्रती वाटचाल केल्यास यश नक्कीच मिळते.असा सल्ला उर्मी संस्थेचे संस्थापक प्रेरणादायी वक्ते जय उपासे यांनी विद्यार्थ्यांना दिला. लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर उच्च माध्यमिक विद्यालय रांजणगाव पोळ येथे शनिवार 12 रोजी विद्यार्थ्यांसाठी इपका लेबोरेटरीज कंपनीच्या वतीने करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इपका कंपनीचे मानव संसाधने भागाचे प्रमुख व्यंकट महिलापुरे हे होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून उर्मी संस्थेचे संचालक जय उपासे हे होते प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजी बोडखे के पी चव्हाण यांची उपस्थिती होती.यावेळी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करताना प्रेरणादायी वक्ते जय उपासे यांनी विविध थोर व्यक्तींचे उदाहरणे देऊन करिअर घडवण्यासंदर्भात मार्गदर्शन केले.तसेच गरिबीला शाप न मानता ते वरदान समजून कठोर परिश्रम करून जीवनात यशस्वी असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. यावेळी अध्यक्ष भाषणात व्यंकट महिलापुरे यांनी विद्यार्थ्यांचे संवाद साधला.तसेच बारावीनंतर विविध क्षेत्रातील संधी आणि त्यासाठी करावे लागणारे परिश्रम या संदर्भात सखोल मार्गदर्शन केले. तसेच गरजू विद्यार्थ्यांना बारावीनंतर कुठलीही मदतीची गरज असल्यास संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी उपस्थित विद्यार्थी व पालकांना व्यंकट महिलापुरे यांनी दिले.कार्यक्रमाचे प्रस्तावित मुख्याध्यापक सुधाकर थोरात यांनी केले.सूत्रसंचालन के.बी.मोरे यांनी तर आभार प्रतिभा नितनवरे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे शिक्षक विलास जाधव, शिवाजी महाजन, अनिल कुमावत, रामेश्वर शेळके, डी.पी.चिमणकर, ए.एन.शेख, सी.एच.गायकवाड, आर. एच. शिरसाट,तुकाराम शेलार, आर. बी.सांगळे, आनंद बोडखे यांच्या सह कर्मचारी एस.बी.बनकर बी.जे.पांडव, ए.एस.बिरुटे आदींनी परिश्रम घेतले.



# भारत जोडो यात्रींचे भव्य आकाराच्या रांगोळीने अनोखे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** भारत जोडो यात्रेचे ७ नोव्हेंबरला नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथून प्रवेश केल्यानंतर मागील सहा दिवस गावा- गावातून या पदयात्रेला प्रतिसाद वाढत आहे. रविवारच्या विश्रांतीनंतर कळमनुरीतील वस्पनगारा फाटा येथून सकाळी जोश व उत्साहात निघाली. सांगली जिल्ह्यातून आलेल्या हजारो लोकांच्या साक्षीने सोमवारी सकाळी भारत जोडो यात्रा निघाली. यात्रेचे बोधचिन्ह मुद्रीत केलेले सफेद टीशर्ट आणि सफेद टोपी घातलेल्या १२ हजार सांगलीकरांच्या उत्स्फूर्त गर्दीने रस्ता फुलून गेला होता. माजी मंत्री आमदार विश्वजीत कदम यांनी पलूस-कडेगाव परिसरातील या कार्यकर्त्यांना भारत जोडो यात्रेत सहभागी केले होते. महाराष्ट्रात यात्रा दाखल झाल्यानंतर देगलूरपासून सांगलीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने यात्रेत आहेत. आज त्यात पुन्हा भर पडली, त्यामध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात आणि स्वातंत्र्यानंतर देशांच्या उभारणीतील पंडीत नेहरूंचे योगदान दर्शविणारे फोटो प्रदर्शन काही ठिकाणी भरली होती. नेहरूंची सातत्याने बदनामी भाजपकडून करण्यात येते, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी नेहरू कुटुंबियांचे देशासाठी योगदान त्यातून दाखवले असल्याचे आयोजकांनी सांगितले. राहुलजी गांधी यांच्या स्वागतासाठी हिंगोलीच्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शेजारी भव्यदिव्य रांगोळीत त्यांची प्रतिमा साकारण्यात आली होती. त्यासाठी राहुल स्वामी या कलावंताने 48 तास मेहनत केल्याचे सांगितले. इतर अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठया रांगोळ्या काढल्या होत्या. कुठे रस्त्यावर गुलाबाच्या फुलांची उधळण होती. तर कुठे लहान मुले गुलाबाची फुले आणि तिरंगी झेंडे हातात घेऊन स्वागतासाठी उभी होती, अशा प्रचंड उत्साहाच्या वातावरणात बालदिनी भारतयात्रींचे जंगी स्वागत हिंगोलीमध्ये झाले. पंडित नेहरू यांची प्रतिमा पुजन करून जागोजागी आदरांजली वाहण्यात आली होती. सत्र न्यायालय परिसरात तीन वर्षाची प्रदक्षिणा राहुलजींच्या स्वागतासाठी आपल्या सवंगड्यासह उभी होती. तर सर्वधर्म समभावचा संदेश देण्यासाठी हिंदू, मुस्लिम, शिख, इसाई धर्माच्या वेशभूषा लहान मुलांनी परिधान केल्या होत्या. शिवाजी महाराजांच्या काळात गावोगावी फिरुन शत्रूची माहिती आमच्या कलांच्या माध्यमातून जमा करून राजापर्यंत पोहोचत होतो. पण आता आम्हाला भिक्षा मागून जगावे लागत आहे. आम्हाला राहायला घरे, दारे, शेती, पेंशन मिळावी, या मागणीसाठी वासुदेव आणि गोंधळी पारंपरिक वेशभूषेत राहुजींना भेटण्यासाठी आले होते. जुनी पेन्शन पूर्ववत लागू झाली पाहिजे, यासाठी राज्य सरकारी कर्मचारी मोठ्या संख्येने सामील झाले होते. तर पुण्यातून आलेल्या डॉक्टर दिलीप लांडे यांनी दोन क्विंटल फुले रस्त्यावर अंथरली होती. राहुल गांधी समाज जोडण्याचे काम करत आहे त्यांना पाठिंबा देण्यासाठी आम्ही आज पंडित नेहरूंच्या जयंतीनिमित्त गुलाबांच्या फुलांनी यात्रेकरूंचे स्वागत करत असल्याचे त्यांनी सांगितले.



# विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती खात्यात जमा करण्याची आ. गावित यांना मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब खेमनार उत्तर महाराष्ट्र युवा कार्याध्यक्ष अभिलाल दादा देवरे धनगर समाज मल्हार सेना व विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे सर्व पालक यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी महेश जमदाडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की धनगर समाजातील N. T व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती सन २०१७ ते सन २०२२ मधिल शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यांवी आमची मुले, मा. प्राचार्य सी., श्री छत्रपती शिवाजी महाराज सैनिक विद्यालय, मोराणे, ता. जि. धुळे येथे शिक्षण घेत असून सर्व विद्यार्थी ( N.T. ) एन.टी. विद्यार्थी संख्या २७ असून एस.बी. सी. मागासवर्गीय विद्यार्थी हे ५ विद्यार्थी आहेत. या विद्यार्थींची जवळ जवळ सतत पाठपुरावा करुन सुध्दा अद्यापपावेतो सन २०१७ ते सन २०२२ पासुन या जवळ जवळ ६ वर्षाची शिष्यवृत्ती अद्यापावेतो न मिळाल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये असंतोष पसरला असून सर्व विद्यार्थ्यांवर फार मोठा अन्याय झाला आहे. याकामी वरील संदर्भिय पत्र देवून सुध्दा अद्यापपावेतो शिष्यवृत्ती मिळालेली टीचामन शिष्यवृत्ती आलेली नसल्याने आम्ही काही करु शकत नाही अशी उत्तरे मिळत नाही. आहेत. तरी मे. साहेबांनी आमच्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार होवून आम्ही शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे, विद्यार्थीनींचे पालक या नात्याने आपणांकडे हा विनंती अर्ज देत असून याकामी आपण या प्रकरणी सखोल चौकशी करुन आपल्या स्तरावरुन संबंधितांना शिष्यवृत्ती त्वरीत देण्यासंबंधीत आदेश पारीत होण्यास विनंती असे. या अर्जासोबत (N.T.) एन.टी. व एस. बी. सी. विद्यार्थी यांची यादी जोडली आहे. तरी माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी साहेब मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिक्षण मंत्री दीपक केसरकर साहेब विभागीय आयुक्त साहेब आपण आपल्या स्तरावर चौकशी करून धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अशी नम्र विनंती.

जर धनगर समाजातील विद्यार्थ्यांना न्याय नाही मिळाला. तर आम्ही सर्व धनगर समाजातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे पालक व प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब खेमनार अभिलाल दादा देवरे उत्तर महाराष्ट्र युवा कार्याध्यक्ष धनगर समाज युवा मल्हार सेनाचे सर्व पदाधिकारी मिळून संपूर्ण महाराष्ट्रभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्रिवस्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल. आणि या आंदोलनाला केंद्र व राज्य सरकार व प्रशासन जबाबदार राहील. युवा मल्हार सेना वतीने सरकारला इशारा देण्यात आला यावेळी निवेदन देतेवेळी प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब खेमनार, धनश्रीताई आजगे, उत्तर महाराष्ट्र युवा कार्याध्यक्ष अभिलाल दादा देवरे, भरतभाऊ शिंदे, जिल्हाध्यक्ष नामदेव चोपडे, जिल्हा सरचिटणीस गोपाल शिंदे, भावी जिल्हा युवा अध्यक्ष सतिलाल कर्वे, भावी जिल्हा युवा कार्याध्यक्ष जिभाऊ पाटील, संदीप मोरे सर, गोरख पाटील, ज्ञानेश्वर पाटील, दत्तात्रय पाटील, नागो पाटील, विठोबा गर्दे धनगर समाजाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते व विद्यार्थी विद्यार्थ्यांचे पालक विनायक मोरे, विजय भाऊ मोरे, वाडीले भाऊ, शिवानी वाघ, पियुष वाघ,व पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शेतात काम करताना महिलेवर वाघाचा हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात एका पतीने आपल्या पत्नीला अक्षरशः मृत्युच्या दाढेतून परत आणले. या व्यक्तीने वाघाच्या तावडीतून पत्नीला सोडवल्याची घटना समोर आली आहे. नागभीड तालुक्यातील ढोरपा गावातील ही घटना असून सविता भुरले असे जखमी महिलेचे नाव आहे. तर सोमेश्वर भुरले असे जिगरबाज व्यक्तीचे नाव आहे.

शेतात काम करताना या महिलेवर वाघाने अचानक हल्ला केला. सविता भुरले या धान कापणीनंतर शेतात पडलेल्या धानाच्या ओंब्या वेचत होत्या. तर सोमेर बाजूच्या बांधात गवत कापत होते. सविता आपल्या कामात व्यक्त असतानाच दबा धरुन बसलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. प्रसंगावधान राखून त्यांनी आरडाओरडा केला. त्यांच्या आवाज ऐकून सोमेश्वर भुरले धावत आले, त्यावेळी वाघ पत्नीला फरफटत नेत असल्याचे दिले. यावेळी पती सोमेश्वर यांनी हिंमत न हारता कुऱ्हाड घेऊन वाघाच्या दिशेने धाव घेतली. यामुळे वाघाचे लक्ष विचलित झाले आणि तो जखमी महिलेला तिथेच टाकून निघून गेला. सध्या या जखमी महिलेवर ब्रह्मपुरीच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.याआधी पालघर जिल्ह्यातही आठ महिन्यांपूर्वी अशीच घटना घडली होती. मोखाडा तालुक्यात 18 मार्च 2022 रोजी रात्री दहा वाजता वाघाने एका वृद्ध महिलेवर हल्ला केला. या वृद्ध महिलेच्या पतीने दाखवलेले प्रसंगवधान आणि धाडसामुळे या महिलेचे प्राण थोडक्यात बचावले. पोशेरा ग्रामपंचायत



हद्दीतील पारध्याची मेट इथल्या शेतावर राहणाऱ्या काशिनाथ सापटे (वय 72 वर्ष) आणि त्यांची पत्नी पार्वती सापटे (वय 65 वर्ष) हे रात्री झोपले असताना बाहेर कसला तरी आवाज आला. या आवाजाचे कारण बघायला पार्वती सापटे उठल्या आणि घराबाहेर पडताच अचानक वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. यावेळी त्यांनी जीव वाचवण्यासाठी आरडाओरड केला. त्यांचा आवाज आल्यावर त्यांचे पती काशिनाथ सापटे यांनी वाघाचा प्रतिकार करुन आपल्या पत्नीला वाघाच्या तावडीतून सोडवले. मात्र वाघ पळून न जाता तिथेच बसून राहिला. हे पाहून या दोघांनी आरडाओरड केली, त्यांचा आवाज ऐकून पारध्याची मेट येथील ग्रामस्थांनी धाव घेऊन, वाघाला पिटाळून लावले. या हल्ल्यात महिला जखमी झाली होती.

तर दोन वर्षांपूर्वी सोशल मीडियावर एका वाघाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. या व्हिडीओमध्ये वाघाच्या तावडीतून सुटण्यासाठी तरुणाने मृत्यूचे सोंग घेत आपला जीव वाचवल्याच दिसत होते. हा व्हिडीओ भंडारा जिल्ह्याच्या तुमसर तालुक्यातील बिनाखी गावातील होता. वाघाच्या या हल्ल्यात तीन जण जखमी झाले होते. या व्हिडीओमध्ये वाघ चक्क एका तरुणाच्या अंगावर बसला. परंतु, या तरुणाने मृत्यूचे नाटक करत आपली सुटका केली.

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान; मदन लाठी यांचे ८२वे रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव खा :** रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. माणसाने आयुष्यात येऊन स्वच्छंदी रक्तदान करून लाडके देवाचे व्हावे हे ब्रीदवाक्य येथील सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार आणि भोकर येथील तापीकाच्या गावातील गरीब शेतकऱ्याचे घरी जन्मास आलेले मदन रामनाथ लाठी यांचे आहे. लहानपणीच काळाने पितृछत्र हरवल्याने पूर्ण शिक्षण चोपडा येथे कैलासवासी डॉक्टर किसनलालजी भुतडा यांच्याकडे झाले त्याच वेळी महाविद्यालयात असताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात त्यांनी पहिल्या रक्तदानाची सुरुवात सत्रासेन येथे तत्कालीन जनता दलाचे आमदार कैलासवासी माधवराव चौधरी व सत्रासेन सरपंच व तत्कालीन प्राध्यापक वर्ग होते. त्याच काळात त्यांनी दैनिक गावकरीचे चोपडा तालुक्याचे पत्रकार म्हणून उत्कृष्ट कार्य केले होते. त्यावेळी दैनिक गावकरीचे कै. द. श पोतनीस सर आणि जळगाव आवृत्तीचे निवासी संपादक कैलासवासी श्री विद्याधर पानट सर यांनी त्यांच्या पत्रकार कार्याची त्यावेळी स्तुती केली होती. त्यानंतर १९८३-८४ नंतर त्यांच्या खऱ्या आयुष्याची सुरुवात भुसावळ येथील श्री विंध्या पेपर मिल्स लिमिटेड उद्योग समुहातून सुरुवात झाली. भुसावळ येथे रक्तपेढी नसल्याने ते जेव्हाही जळगावात येत असत आणि त्यांना जसे शक्य होत असे त्याप्रमाणे रक्तदान करत होते. 2001 मध्ये त्यांना जळगाव स्थलांतरित व्हावे लागले त्यानंतर त्यांचे रक्तदान नियमित सुरू राहिले. जळगाव नागपूर शिर्डी येथील साई मंदिर पिंपरी चिंचवड येथील वाय. सी. एम. आणि विविध रक्तपेढीत त्यांचे रक्तदान सुरू राहिले. यात एक वैशिष्ट्य म्हणजे तत्कालीन आपल्या देशाचे राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद सर यांचा एक ऑक्टोबर 2021 रोजी 76 वा वाढदिवस आणि मदन लाठी यांचा 76 वे रक्तदान हा एक योगायोगच म्हणावा लागेल त्यानंतर 2 जानेवारी रोजी महाराष्ट्र पोलीस स्थापना दिन एक मे महाराष्ट्र दिवस 15 ऑगस्ट आजादी का महोत्सव आणि आज 14 नोव्हेंबर रोजी त्यांनी रक्तदान पूर्ण केले. मध्यंतरी 2020 मध्ये पहिल्या करोना लाटेत त्यांना करोणा झाल्याने त्यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून दोनदा प्लाजमा



रक्तदान दिले त्यात पहिले प्लाजमा 7 नोव्हेंबर 2020 आणि दुसरे प्लाजमा १२ डिसेंबर २०२० रोजी आणि त्याच वेळी सोलापूर येथील घाडगे पिंपरी चिंचवड येथील लोकमान्य मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल मध्ये भरती होते अति दक्षता विभागात त्यावेळी त्यांना प्लाज्माचे आवश्यकता पडली त्यावेळी श्री मदन लाठी यांचा संपर्क झाला आणि त्यांनी त्याच दिवशी क्लासला दिल्याने श्री घाडगे यांना जीवनदान मिळाले त्यानंतर हडपसर येथील श्री पिंगळे यांना त्यांनी प्लाजमा उपलब्ध केल्याने आज त्यांनाही जीवनदान मिळालेले आहे.

त्यांच्या या उपक्रमाबद्दल महाराष्ट्र माहेश्वरी युवा संघटनेने त्यांना करोना योद्धा म्हणून सन्मानपत्र दिले आहे. आणि त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आला त्यात पिंपरी चिंचवड येथील माहेश्वरी समाज, न्यू सांगवी येथील माहेश्वरी समाज, न्यू सांगवी येथील खानदेश मित्र मंडळ, पिंपळे गुरव येथील राष्ट्रवादीचे नगरसेवक श्री श्याम जगताप, आणि ते ज्या सोसायटीत राहत होते त्या सोसायटीच्या त्यांच्या वार्षिक सभेत , आणि मागच्या रविवारी जळगाव येथे लाठी कुलस्वामिनी मंदिरात त्यांच्या वार्षिक सभेत त्यांचा सत्कार करण्यात आला. मदनलाठी यांच्या रक्तदानाच्या उपक्रमामध्ये उपक्रमाबद्दल आपल्या देशाचे तत्कालीन केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ हर्षवर्धन सर यांनी त्यांचे कौतुक केले आणि लोकांना या कार्यासाठी प्रेरित करत राहा असा सल्ला मेलद्वारे देण्यात आला. मदनलाठीच्या या रक्तदानाच्या उपक्रमाबरोबरच त्यांचे सामाजिक कार्य नियमित सुरू असतात.



# समाजाच्या प्रश्नांविषयी सरकारला जाब विचारणार : प्रा. रामचंद्र भरांडे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** स्वातंत्र्यांच्या 75 वर्षानंतरही मातंग समाजावर अन्याय, अत्याचार, दडपशाही सुरूच आहे, अनेक विधानसभा मतदार संघात निर्णायक भूमिका हाताळणाऱ्या या समाजातील शोषित पीडित घटकापर्यंत सामाजिक न्याय पोहोचलाच नाही, अनेक दिवसांपासून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे महामंडळ बंद आहे, बार्टीच्या पक्षपाती धोरणामुळे मातंग समाजातील विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे या सर्व प्रश्नांना घेऊन राज्य सरकार जाब विचारण्यासाठी संबंध महाराष्ट्रभर तीव्र लढा उभारणार असल्याचा इशारा लोकस्वराज्य आंदोलनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे यांनी दिला आहे.

ते वाळूज येथील बैठकीत बोलत होते. ते पुढे म्हणाले की इतर मागासवर्गीय समाजाच्या तुलनेत मातंग समाज पिछाडीवर आहे. समाजातील प्रत्येकाने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून एकत्र यावे, शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या त्रिसूत्रीचा वापर केला तरच समाजाला उज्जवल भविष्य आहे. आज प्रत्येक मांगवाड्यात आर.आर. एस.ची मंडळी फिरत असून थोर क्रांतिकारक वस्ताद लहुजी साळवे यांच्या विचारांना मूठमाती देऊन या महान क्रांतिकारकाचे दैवतीकरण करीत आहेत. समाजातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दलालांना उघडे पाडल्याशिवाय समाजाचे प्रश्न सुटणार नाहीत असे ते म्हणाले.

या बैठकीला औरंगाबाद जिल्हाप्रमुख अतुल ह. खंडगावकर, वाळूज महानगर प्रमुख हणमंत नामाकर, ज्येष्ठ नेते शंकर मामा ननुरे, सहदेव गुंडले, जेजेराव मोरे, विठ्ठल नवगिरे, गणपत गुंडले आदींसह समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# शेतात आढळला विषारी घोणस जातीचा साप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सर्पमित्र दिनेश गिरासे व सर्व मित्र बाबा थोरात यांनी शिरपूर येथील एका उसाच्या शेतात अत्यंत विषारी घोणस जातीचा साप पकडला. या सापाचे भारतातील चार विषारी सापांपैकी अतिविषारी सापांच्या यादीत नाव आहे. थंडीच्या दिवसात उसाची कापणी होत असते अशा वेळेस भयंकर वन्यजीवांचा सामना करावा लागतो. अशाच प्रकारे शिरपूर येथील सर्पमित्र बाबा थोरात यांनी मानवी जीव वाचवण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या ठिकाणी विषारी सर्प निघाला त्या ठिकाणी ऊस तोडणारे कर्मचारी यांनी आभार व्यक्त केले. बाबा थोरात यांनी तो सर्प पकडून सुळे गावाजवळ मानवी वस्ती पासून लांब जगंलात सोडला.



# खरीप हंगाम २०२३ करीता घरचे सोयाबीन बियाणे राखून ठेवून त्याची काळजी घ्यावी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील शेतकऱ्यांनी सोयाबीनची कापणी पश्चात व बियाणे साठवणूकीत बियाण्याची काळजी घ्यावी अशे सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी एस.जी. वाघ यांनी शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे. खरीप २०२३ मध्ये सोयाबीन बियाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी खरीप २०२२ मध्ये राज्यात व्यापक प्रमाणात घरचे सोयाबीन बियाणे मोहीम हाती घेण्यात आलेली आहे. यावर्षी खरीप हंगामात सोयाबीन काढणीच्या काळात झालेल्या अवेळी पावसामुळे सोयाबीन बियाणे उत्पादनावर व गुणवत्तेवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे खरीप २०२३ मध्ये सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामार्फत बियाणे विक्री केंद्रावर उपलब्ध होणाऱ्या प्रमाणित सोयाबीन बियाण्याचे प्रमाण कमी असणार आहे. त्यासाठी उत्पादीत झालेल्या सोयाबीन बियाणेची योग्य पद्धतीने साठवणूक करणे आवश्यक आहे, जेणेकरून सदर बियाणे खरीप २०२३ करीता पेरणीसाठी उपलब्ध होईल. याअनुषंगाने स्थानिक पातळीवर शेतकरी बांधवांमध्ये सोयाबीनची कापणी पश्चात व बियाणे साठवणूकी संदर्भात घ्यावयाची काळजी याबाबत जागृती करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत खरीप २०२३ करीता बीजोत्पादनासाठी उत्पादित होणाऱ्या सोयाबीन बियाण्याची शेतक-यांनी विशेष काळजी घ्यावी;कृषी सहाय्यक मानसिंग भोळे यांनी बोलताना सांगितले.



औरंगाबादेतील जटवाडा रोडवरील मासाहेब चौक येथे तुषार कलर होमचे आज थाटात नूतन वास्तूत प्रवेश झाले. त्याप्रसंगी तुषार कलर होमचे संचालक विशाल वेताळ यांना शुभेच्या देताना होनाजीनगरचे समाजसेवक अशोक पाटील गायकवाड, भैया साहेब निभोरकर सह निलेश कुमावत.



# बालदिनानिमित्त छोट्या मुलांचे विविध कार्यक्रमांद्वारे पंडित नेहरूंना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर येथील मौ,आझाद विद्यालयात माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू जयंती व बाल दिनानिमित्त सोमवार(ता,१४) रोजी शालेय विद्यार्थ्यांनी गाणी गाऊन, भाषणे करून व विविध कला सादर करून नेहरूंना अभिवादन केले, बालकवी व साहित्यिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी नेहरू जीवनावर व शिक्षणावर कविता सादर करून मुलांना पंडित नेहरू यांच्या जीवनातिल गोष्टी सांगितल्या. याप्रसंगी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जी.जी. राजपूत होते,धोंडीराम राजपूत यांनी नेहरूंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी शिक्षक के.एस. रावकर,व्ही,आर, तगरे,सुनीता वसावे, पल्लवी टाकळकर, श्रीमती टी.व्ही. होलप, व बी. बी. जाधव यांची उपस्थिती होती.


# कै. नारायण उजळंबकर वाचनालयातर्फे बालदिन उत्साहात




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** औरंगाबादच्या सिडको एन-४ मधिल कै.नारायण उजळंबकर वाचनालयातर्फे बालदिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. बालदिनाचे औचित्य साधून वाचनालया तर्फे रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रसिद्ध रांगोळी कलावंत सुधीर कोर्टीकर होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे संस्थापक अशोक उजळंबकरांनी केले.पाहुण्यांचे स्वागत सपना उजळंबकरांनी केले. अध्यक्षीय विचार मांडताना रांगोळी कलावंत सुधीर कोर्टीकर म्हणाले चित्रकला .. रांगोळीतून कलावंत आपले अंतरंग प्रगट करीत असतो. पाहणाऱ्या प्रत्येकाच्या मनात आनंदाची निर्मिती करतो. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक तरी कला जोपासली पाहिजे. बालदिनाच्या प्रित्यर्थ घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धाचे परिक्षक म्हणून रांगोळी कलावंत सुधीर कोर्टीकर आणि सपना उजळंबकरांनी पाहिले. सिडको एन -४ मधिल किलबिल प्रशालेच्या वीस मुलींनी विलक्षण सुंदर रांगोळ्या साकारलेल्या होत्या. पृथ्वी पूर्णाजी तावडे (प्रथम) मयुरी रामदास कांबळे (द्वितीय) प्राजक्ता दिपक कारभार (तृतीय) सुभिक्षा केशव टेकाळे (चतुर्थ) यांना अध्यक्ष सुधीर कोर्टीकरांच्या हस्ते भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. क्लासेसमुळे सर्व मुली प्रशालेतच होत्या त्यामुळे त्यांच्या कलाशिक्षीका स्वाती वझुरकर यांनी भेटवस्तू स्विकारल्या. शेवटी आभार प्रदर्शन गणेश देशपांडे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय जोग यांनी केले. कार्यक्रमासाठी विजय जोग, रमाकांत जगत, डॉ. सुभाष पोफळे, श्रीमती हेमलता चौधरी, स्वाती वझुरकर, स्वाती धुळधुळे, सुहास धुळधुळे यांनी विशेष परिश्रम घेतले.











# अनुसूचित जमाती व वनवासींची वनहक्कासाठी निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आदिवासी क्रांतीवीर बिरसा मुंडा जयंतीनिमित्ताने सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा व सत्यशोधक शेतकरी सभेच्या वतीने केंद्र सरकार व राज्यसरकारच्या विरोधात तीव्र निदर्शने करण्यात आले. आदिवासी वनहक्क कायदा होऊन १५ वर्षे झाले पण या कायद्याची योग्य अंमलबजावणी सरकारने केली नाही त्यामुळे आदिवासी कष्टकरी शेतकरी वनहक्कांचा ७/१२ उतारा दिलेला नाही त्यातच केंद्र सरकारने नविन वनविधेयक २०२२ कायदा आणून आदिवासी व इतर पारंपारिक वननिवासींना जल जंगल जमिनीपासून बेदखल करण्याचे कट कारस्थान आहे असे या निवेदनात म्हटले. यात हजारो आदिवासी कष्टकरी वनहक्कापासून वंचित होणार आहे . देशात आदिवासी समाज हा जल जंगल जमिनीवरच आपला कुटुंबांचा उदरनिर्वाह करत आलेला आहे म्हणुन बिरसा मुंडा यांना १९ व्या शतकात ब्रिटीश व सावकारां विरुध्द ' उलगुलान ' चा नारा देऊन संघर्ष केला होता व बिरसा मुंडा जयंती निमित्ताने जलजंगलावरच्या अधिकार शाबूत ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर येऊन विविध मागण्यांचे निवदेन देण्यात आले व क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्ताने अनेक मागण्या करण्यात आल्या . १ )आदिवासी व इतर पारंपारिक वननिवासी वनहक्क कायद्याप्रमाणे सर्व वनहक्क दावेदारांना नियम १३ ( १ ) नुसार केवळ दोन पुरावे ग्राह्य धरुन मालकी हक्काचा ७/१२ उतारा द्या .२ )दि २८ जून २०२२ रोजी केंद्राच्या वन व पर्यावरण मंत्रालयाने अधिसूचित केलेले वनसंवर्धन नियम २०२२ हे आदिवासी व इतर वननिवासीवर अन्याय करणारा आहे तो वनसंवर्धन कायदा २०२२ चा कायदा रद्द करण्यात यावा .. ३ )चालू हंगामात धुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली त्यामुहे अल्पभुधारक शेतकरी व वनहक्क दावेदारांच्या पिकाचे नुकसान झालेले आहे त्यांचे सरसकट पंचनामे करून भरपाई द्यावी , ४ )धुळे तालुक्यात गायरान जमिनीवर पिढ्यानपिढ्या शेती करून उदरनिर्वाह करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांची चौकशी करून त्यांना कसत असलेल्या गायरान जमिनी नियमानुकूल करुन ७/१२ देण्यात यावा ५ )उपविभागीय वनहक्क समितीने सुमोटो नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत मार्ग घेऊन उपविभागीय पातळीवर फेरतपासणी करण्यात यावी . ६ )शासन निर्णय १० नोव्हेंबर २०१६ प्रमाणे धुळे तालुक्यात G.P.S. मोजणी व स्थळ पाहणी करण्याचे आदेश आहे . त्याची अंमलबजावणी करावी . ७ )राज्य सरकारने उसतोड कामगारांसाठी महामंडळ स्थापन केले आहे . त्यासाठी उसतोडणी मजुरांचे सके ग्रामसेवक मार्फत करण्याचे घोषित झालेले आहे . परंतु अद्यापही धुळे तालुक्यात ऊस तोड मजुरांचे सव्हे व ओळखपत्रही देण्यात आलेले नाही . ८ ) जीर्ण झालेले रेशनकार्ड बदलून नवीन रेशन कार्ड देण्यात यावे . ९ )शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमी भाव देणारा MSP गॅरंटी कायदा करा . १० ) रोजगार हमी कायद्या अंतर्गत आदिवासी वनहक्क दावेदारांच्या जमिनी बांध बंदिस्ती , सपाटीकरण इ . कामे करण्यात यावी अशाप्रकारे निवेदनाद्वारे मागण्या करण्यात आल्या.

## राष्ट्रवादीच्या अल्पसंख्यांक विभागाच्या कोषाध्यक्षपदी जोसेफ आण्णा मलबारी

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्यांक विभागाच्या राष्ट्रीय स्तरावरच्या कोषाध्यक्षपदी धुळ्याचे जोसेफअण्णा मलबारी यांची स्तुत्य निवड झाली आहे. या निवडीनंतर त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे . राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्यांक विभागाची महत्वाची बैठक पक्षाच्या नवी दिल्लीतील केंद्रीय कार्यालयात नुकतीच संपन्न झाली. या बैठकीनंतर अल्पसंख्यांक विभागाचे चेअरमन सिराज मेहंदी यांनी राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या संमतीने महासचिव आठ सचिव , दोन संयुक्त सचिव आणि एका कोषाध्यक्षाचा अल्पसंख्यांक विभागाच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची घोषणा केली . त्यामध्ये ९ उपाध्यक्ष १२ समावेश आहे . धुळ्याचे जोसेफ अण्णा मलबारी यांना राज्यातून या कार्यकारणीत स्थान मिळाले आहे. जोसेफ मलबारी यांची कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## बालकदिनी कैद्यांनी घेतली मुलांची गळाभेट

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** कारागृह प्रशासनाने बालकदिनाचे औचित्य साधून कारागृहात गळाभेट कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात ७२ कैद्यांच्या १०३ मुला-मुलींनी वडिलांची भेट घेऊन आनंद व्यक्त केला. मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांमध्ये सकारात्मकता निर्माण व्हावी आणि त्यांनाही मुले आणि कुटुंबीयांशी भेटता यावे, या उद्देशाने कारागृह प्रशासन गळाभेट उपक्रम राबवत असते. यावेळी ७२ कैद्यांनी मुलांना भेटण्याची इच्छा दर्शवली होती.त्यामुळे आज बालकदिनी १०३ मुला-मुलींना कारागृहात बोलावण्यात आले. जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव जयदीप पांडे, कारागृह अधीक्षक अनुपकुमर कुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम राबवण्यात आला. सर्व मुलांना बालकदिनाच्या शुभेच्छा देऊन मुलांच्या हातून रंगबेरंगी फुगे आकाशात सोडण्यात आले. त्यानंतर सर्व मुलांना जेवण आणि मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी मुलांनी आपल्या वडिलांशी मनसोक्त गप्पा मारल्या आणि त्यांच्यासोबत खेळले. त्यामुळे कारागृहातील वातावरण कौटुंबिक झाले होते.

## शतक महोत्सवानिमित्त कमलाबाई हायस्कूल येथे विविध उपक्रम राबवणार



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्त्री शिक्षण संस्थेचे चंदादेवी सुभाषचंद्र रुणवाल शैक्षणिक संकुल आपला शतक महोत्सव साजरा करीत आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १८ नोव्हेंबर रोजी मा विवेक सावंत संस्थापक संचालक यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. व्याख्यान दोन सत्रात होईल . १ ले सत्र सकाळी ११ ते १ विदयार्थिनींसाठी आयोजीत केले आहे . या व्याख्यानाचा विषय आहे. करियरच्या संधी इ .१० वी ते १२ वी नंतरच्या विविध अभ्यासक्रमांची ओळख यातून विद्यार्थिनींना होईल. दुपारच्या सत्रात ३ ते ५ बदलत्या शिक्षण पध्दती यावर शिक्षकांसाठी मार्गदर्शन होईल. यासाठी धुळे शहरातील शिक्षकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षांनी दिले, असे त्यानंतर दि . २१ व २२ नोव्हेंबर सोमवार मंगळवार या दोन्ही दिवशी इ . ८ वी ते १२ वी पर्यंतच्या शालेय विद्यार्थी - विदयार्थिनींसाठी साहित्य संमेलन आयोजीत केले आहे . हे संमेलन धुळे जिल्हयातील विदयार्थी व शिक्षकांसाठी आहे. या संमेलनाच्या उद्घाटनासाठी सुप्रसिध्द लेखिका अरुणाताई ढेरे यांची उपस्थिती अमूल्य राहणार आहे व समारोपासाठी सुप्रसिध्द कवी अरुणजी म्हात्रे येणार आहेत अशा सुवर्णसंधीचा लाभ धुळे जिल्हयातील विद्यार्थी, प्राध्यापक, अध्यापक , संस्थाचालक व साहित्य रसिकांनी घ्यावा अशी विनंती स्त्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा अलका बियाणी यांनी केली आहे.



# घरातील खाणारी चार तोंडे कशी भरवायची ?

## भोकर तालुक्यातील शेतकरी मेटाकुटीला : खरिपासह रब्बी हंगाम धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** काळ्या आईची अविरत मशागत केल्याने सूखाचे चार घास मिळाले..घरादारात धनधान्याची रास असायची..मागील अनेक वर्षांपासून निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीउत्पादनात घट झाली. बाजारपेठेत मालाला योग्य भाव मिळत नाही. यंदा खरिप हंगामाने धोका दिला अतिवृष्टीने रब्बी हंगाम धोक्यात आला आहे.. घरात खाणारी चार तोंड कशी भरवायची याची चिंता शेतकऱ्यांला सतावते आहे. पूर्वी तीन श्रूतू आपापली जबाबदारी चोख बजावत होते कालांतराने श्रुतु बदलाचा रोग लागला आणि शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला. भारत कृषिप्रधान देश म्हणून ओळखला



जातो याच देशात निसर्गाच्या लहरीपणामुळे जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी चारी बाजूंनी संकटात सापडला आहे. यंदाचा पावसाळा वेळेवर आल्याने बळीराजा सुखावला होता. पावसाळा संपला तरी" वरूणराजे" पाठ सोडायला तयार नाहीत परिणाम अतिवृष्टीने शेताला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले.हातातोंडाला आलेल्या खरिप पिकाची मोठ्या प्रमाणावर हाणी झाली.महागडे बि-बियाणे खरेदी करून काळ्या आईची ओटी भरली पण पदरात निराशा पडली आहे.सरकार मायबाप केवळ आसवे पूसण्याचे काम करून स्वताची पाठ थोपटून घेण्यात धन्यता मानत आहे. गरीब बिचा-या शेतकऱ्यांची कळवळा कुणालाच येत नाही हि फार मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.नुकसान लाखोंचे झाले आणि मदत मात्र तूटपूंजी देऊन मोकळे होत आहेत.

**रब्बीचा भरवसा नाही**

तालुक्यातील पर्जन्यमान हे नऊसे ते एकहजार मीलीमीटर इतके आहे.यात कमी अधिक प्रमाणात पाऊस होतो यावर्षी मात्र तो अधिकच मेहेरबान झाल्याने खरिप हंगाम गेला आता भिस्त आहे रब्बी हंगामावर पण अतिवृष्टी झाल्याने शेतातील जमिन ओली आहे तर काही ठिकाणी उन्हाच्या तीव्रतेने कडक झाली आहे. त्यामुळे रब्बी हंगाम घेण्यासाठी अडचण होते आहे.ऊशिराने रब्बीची लागवड केली तर उत्पादन घटण्याची दाट शक्यता आहे.खरिप गेलं आता रब्बी हंगामात चांगले उत्पादन मिळावे अशी अपेक्षा शेतकरी उराशी बाळगून आहे.आता तरी देवा मला पावशील का...? अशी विनवणी केली जात आहे.

**कापूस वेचणी थांबली**

कापसाला पांढरसोन म्हणून ओळखल्या जाते. यंदामात्र अतिवृष्टीने कापसाचे उत्पादन घटले आहे.दरवर्षी दसऱ्याला कापसाचा काटा केला जातो यावर्षी कापूसच उशिराने आल्याने मुहूर्त सापडला नाही.प्रारभी कापसाला तेरासे रूपये क्विंटल भाव देण्यात आला आता थोडाफार कापूस बाजारात येताच सातसे ते आठसे रूपये क्विंटल करण्यात आला आहे. कापूस वेचणीला मजूर मिळत नाहीत की आणखी भाववाढ होईल या प्रतिक्षेत शेतकरी मात्र आणखी कापूस वेचणीला सूरूवात केली नसल्याचे दिसून येत आहे.

# पोलिस उपनिरीक्षकांकडे चोरट्यांचा डल्ला : पिस्टलासह दीड लाखांचा ऐवज लांबवला

आधुनिक केसरी न्यूज

**शहादा :** चोऱ्या-घरफोड्या नवीन नाही मात्र शहाद्यात चोरट्यांनी थेट फौजदाराच्या घरातच चोरी करून यंत्रणेला आव्हान दिले आहे. विशेष म्हणजे चोरट्यांनी दिड लाखांच्या मुद्देमालासह सर्विस रीव्हॉल्व्हर तसेच 30 जिवंत काडतूस लांबवल्याने पोलिस यंत्रणा पुरती हादरली आहे. चोरट्यांचा कसून शोध सुरू करण्यात आला आहे.



पोलीस उपनिरीक्षक भगवान कोळी यांच्या शहादा येथील दिनदयाळ नगरमधल्या राहत्या घरातून अज्ञात चोरट्यांनी एक शासकीय सर्व्हिस रीव्हॉल्व्हर तसेच 30 जिवंत काडतुस यांसह एक लाख 12 हजारांची रोकड तसेच 50 हजार रुपये किंमतीचे दहा ग्रॅम वजनाची सोन्याची लगड असा एकूण एक लाख 62 रुपयांचा ऐवज लांबवला. उपनिरीक्षक कोळी हे पाच दिवस रजेवर होते व घरी परतल्यानंतर त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. पिस्टल व जिवंत काडतुसे चोरी प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात शहादा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या धाडसी चोरीमुळे पोलिस यंत्रणेत पुरती खळबळ उडाली असून चोरट्यांचा जिल्ह्यात सर्वत्र शोध सुरू करण्यात आला आहे.

# सोयगाव डोंगरी भागातील नोकर भरतीत वयाच्या अटीत सूट देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुका शंभर टक्के डोंगरी भाग असल्याने विविध सुविधांपासून कोसो दूर असून युवक बेरोजगार आहेत. शासनाने डोंगरी भागासाठी विविध विभागाच्या जागा भरताना सोयगाव तालुक्यासाठी युवकांना वयाची अट शिथिल करून पाच टक्के जागा राखीव करण्याची मागणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनुसूचित जाती तालुकाध्यक्ष तालुकाध्यक्ष सुनील माकोडे सावळदबारा यांनी एका निवेदनाद्वारे सोयगाव तहसीलदारांकडे केली आहे. सोयगाव तालुक्याचा निजाम काळापासून विकास झालेला नाही. शासनाच्या विविध योजना उशिरा पोहोचत असल्याने येथील युवक शिक्षण घेऊन बेरोजगार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर रहीमखाँन पठाण, सुनील चोरमारे, मो. आशपाक मो.इशा, सागर जैस्वाल, दिपक गावडे, राहुल टिकारे, सुरज ठाकूर, पवन कुल्ले,शुभंम पुजारी, विलास रावळकर,गणेश महाजन यांच्या सह्या आहेत. या निवेदनाच्या प्रति तहसीलदार सोयगाव यांच्यामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वनमंत्री, कृषिमंत्री, विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना पाठवण्यात आल्या आहेत.



# देऊळगाव गुजरी येथील कापूस चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील तालुक्यातील देऊळगाव गुजरी येथील परिसरात कापूस चोरीला गेल्याची सत्र सुरूच गेल्या आठ ते दहा दिवसांपासून एकाच शिवारातून मध्यरात्रीच्या सुमारास देऊळगाव गुजरी येथील शेतकरी संतोष मानसिंग राठोड गट क्र. ३४ रेणुकाबाई गणेश राठोड गट क्र ६६ तर सुशिलाबाई मधुकर जटाळे गट क्र ६१ आशा या तीन शेतकरी मिळून किमान अंदाजे सात ते आठ क्विंटल कापूस चोरीला गेल्याचे प्रकार लक्षात येताच, शेतकऱ्यांनी पोलिसात धाव घेतली व पहूर पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या आ. पो. फत्तेपूर पोलीस स्टेशनला हा सर्व प्रकार लक्षात घेऊन आला.

पो. फत्तेपूर येथील पो. हे. कॉ. प्रवीण चौधरी व जिजाबराव कोकणे यांनी घटनास्थळी धाव घेतली व सदरील चोरी गेलेल्या शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे करण्यात आले. शेतकरी संतोष राठोड यांनी पोलीस प्रशासनाला श्वानपथक ची मागणी केली. एकीकडे आसमानी संकटाचे निवारण झाले तर दुसरीकडे भुरट्या चोरांचा धुमाकूळ वाढल्याने शेतकऱ्यांच्या तोंडी आलेला घास हिसकावल्याने देऊळगाव गुजरी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे भितीचे वातावरण पसरले आहे.

# नेत्रसेवा आपल्या दारी, या डोळे तपासणी शिबिरात ८२ रुग्णांची डोळे तपासणी




आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** चिखलठाणा लायन्स आय हॉस्पिटल व भगवान महावीर रुग्णालय नगर परिषद वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार(ता,१४)रोजी भगवान महावीर रुग्णालयात नेत्र सेवा आपल्या दारी अंतर्गत डोळे तपासणी शिबीर घेण्यात आले, या शिबिरात ८२रुग्णांची तपासणी करण्यात आली यात ३१रुग्ण मोती बिंदू शस्त्रक्रियासाठी निघाले यांच्या डोळ्याचे औरंगाबाद येथे मोफत शस्त्रक्रिया होणार आहे, असे प्रकल्प समन्वयक विनोद हरकुटे यांनी सांगितले, सदर नेत्र तपासणी शिबीर आता यापुढे दर सोमवारी सकाळी१०-३०ते दुपार २-०० पर्यत दर आठवड्याला राहणार आहे,या शिबिराचे उदघाटन नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी,उपाध्यक्ष साबरखान व मुख्याधिकारी भागवत बिघोत व नगरसेवक यांच्या उपस्थितीत झाले. स्वच्छता दूत धोंडीरामसिंह राजपूत,वैद्यकीय अधिकारी डॉ. सविता निकाळे, सहाय्यक अशोक गाडेकर, परिचारिका सहाय्यक संगीता सिरसाट, तसेच चेतन निखाडे, गणेश निकम, लखन गाडेकर यांनी शिबीर यशस्वीतेसाठी सहकार्य केले,नेत्र तपासणीक उत्कर्षा वैद्य, अक्षय ढाकरे,सविता शेजवळ यांनी रुग्ण तपासले, शेवटी डी.डी. ठाकूर यांनी आभार मानले.



आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद




# भ्रष्टाचारमुक्त कल्याणाच्या योजना हे सरकारचे वैशिष्ट्य

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** घर, शौचालय, गॅस, पाणी यासारख्या सुविधा कोणत्याही भ्रष्टाचाराविना गोरगरीबांपर्यंत पोहचविल्या हे मोदी सरकारच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केले. भाजपा प्रदेश कार्यालयात 'धन्यवाद मोदीजी' कार्यक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राज्यातील १० लाख लाभार्थ्यांची आभाराची पत्रे पाठवण्याच्या कार्यक्रमातफडणवीस बोलत होते. भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे, सहकारमंत्री अतुल सावे, भाजपा प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, अ‍ॅड.माधवी नाईक, अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मा. एजाज देशमुख, अभियानाच्या संयोजिका मा.श्वेता शालिनी आदी यावेळी उपस्थित होते. फडणवीस म्हणाले की, गरीब कल्याणाच्या कार्यक्रमाबाबत पूर्वीही देशात बोलले जात असे, मात्र हे कार्यक्रम कधी प्रत्यक्षात आले नव्हते. मोदी सरकारने गरीब कल्याण हे एकमेव उद्दिष्ट ठेवून अनेक योजना सुरु केल्या. एक पैशाचाही भ्रष्टाचार न होता या योजनांचे लाभ गोरगरीबांपर्यंत पोहचत आहेत. धर्म, जात, पंथ न पाहता गरीबांपर्यंत कल्याणकारी योजनांचे लाभ पोहचविले जात आहेत. वेगवेगळ्या योजनेच्या लाभार्थ्यांची पत्रे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवण्याचा प्रदेश भाजपाचा उपक्रम अभिनंदनीय आहे. प्रदेश भाजपाने ठरवलेले अडीच कोटी लाभार्थ्यांची पत्रे पाठवण्याचे उद्दिष्ट निर्धारित मुदतीत साध्य करण्यासाठी कार्यकर्त्यांनी त्वरेने कार्यरत व्हावे असेहीफडणवीस म्हणाले. प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्यातील १३ कोटी जनतेपैकी ५ कोटी ६५ लाख लोकांना मोदी सरकारच्या वेगवेगळ्या योजनांचा लाभ मिळाला आहे. यापैकी अडीच कोटी लाभार्थ्यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धन्यवाद देणारी पत्रे फेब्रुवारी २०२४ पर्यंत पाठवण्याचा संकल्प पक्षाने केला आहे. हे उद्दिष्ट नक्की साध्य करू असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या अल्पसंख्याक मोर्चा, महिला मोर्चा आणि युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांचे बावनकुळे यांनी अभिनंदन केले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते 'फ्रेंड्स ऑफ बीजेपी' या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. हे अभियान सुरु केल्याबद्दल श्री.फडणवीस यांनी प्रदेशाध्यक्ष आ.बावनकुळे यांचे अभिनंदन केले.



# भाऊसाहेब ठोंबरे व विजय ठोंबरे यांच्यासह अनेकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील व विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत औरंगाबादचे भाऊसाहेब ठोंबरे व विजय ठोंबरे यांच्यासह अनेकांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मुंबई प्रदेश कार्यालयात जाहीर प्रवेश केला. यावेळी पंकज ठोंबरे, विनायकराव गाडे, सत्यजित सोमवंशी, ऐराज शेख, अमृत शिंदे, भगतसिंह राजपूत, निलेश डाहके, नितीन थोरात, संदीप मोटे आदींसह इतरांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घड्याळ हाती बांधले. प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस परिवारात सहभागी झालेल्या सर्व नवीन सदस्यांचे स्वागत केले व पक्ष संघटना मजबूत करण्याबाबत त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अजितदादा पवार यांनी उपस्थितांना संबोधित केले. या पक्ष प्रवेशामुळे औरंगाबाद जिल्ह्यात पक्षाची ताकद वाढणार आहे. पक्षाची ध्येयधोरणे व कार्य तळागळापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण सर्व कटिबद्ध राहाल, अशा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, माजी आमदार व औरंगाबाद निरीक्षक अमरसिंह पंडित, औरंगाबाद ग्रामीण जिल्हाध्यक्ष कैलास पाटील आदींसह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आंबेडकरनगरातील तरुणांना मारहाण; अ‍ॅट्रासिटी दाखल करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आंबेडकर नगरातील दोन तरुणांना काही जणांनी जातीवाचक शिवीगाळ करीत बेदम मारहाण केली. यात दोघे तरुण गंभीररीत्या जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. याप्रकरणी पोलीसांनी अ‍ॅट्रासिटीसह कलम 307 लावून गुन्हा दाखल करण्याऐवजी कलम 326, 394 नुसार गुन्हा दाखल केल्याने पोलीसांवर दुर्लक्ष केल्याचा आरोप जखमींच्या नातलगांनी केला आहे. यासंदर्भात पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांना निवेदन देवून कलम 307 सह अ‍ॅट्रासिटीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. आनंदसिंग वाघ, आकाश माळी हे दोघे तरुण 9 नोव्हेंबर रोजी हळदीच्या कार्यक्रमानंतर परतत असताना रात्री 1 ते दीड वाजेदरम्यान योगेश गवळी, कुणाल अर्जुन गवळी व इतर पाच ते सहा जणांनी साक्री रोडवरील पॉवर हाऊस येथे दोघांना अडवून जातीवाचक शिवीगाळ करीत पैशांची मागणी केली. दोघांना पुन्हा शिवीगाळ करीत रॉड व धारदार शस्त्रांनी बेदम मारहाण केली. सनीच्या डोक्यावर जोरदार वार केल्याने मोठी जखम झाली. तर आकाश याच्या हातापायांवर जोरात प्रहार केल्याने तोही गंभीर जखमी झाला. याप्रकरणी पश्चिम देवपूर पोलीसात दाखल केलेल्या गुन्ह्यात अ‍ॅट्रासिटी व कलम 307 वाढवा, हल्लेखोरांसह त्यांना पाठबळ देणाऱ्या लोकांवर कठोर कारवाई करा, जखमींच्या कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे अशा मागण्यांचे निवेदन जखमींच्या कुटुंबियांनी वंचित बहुजन आघाडीचे राज चव्हाण, शंकर खरात, नितीन म्हसदे यांच्या नेतृत्वात पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांना सादर केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# बाजार सावंगीमध्ये नेहरू जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजार सावंगी येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय मध्ये नेहरू जयंती साजरी करण्यात आली. सरपंच अप्पाराव पाटील नलावडे, चेअरमन शिवजी काटकर सुधाकर औटे ग्रा.पं. सदस्य पोपट काटकर, माजी सरपंच भिमराव पाटील नलावडे, माजी ग्रापंसदस्य चांदखान पठाण, कल्याण काटकर, पंडित राव घुले, ग्राम विकास अधिकारी एबी बनसोड, कर्मचारी बबन नलावडे, बंडु नलावडे, शुभम चव्हाण, बबन शेषराव नलावडे आदि उपस्थित होते.